गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
**महावीर पेन्शन ठेव योजना**
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*

श्री. संजय काठेड (संस्थापक)
Mo. 9372444001
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर.
फोन नं. : 0241-2993900



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, रविवार दि. २६.०१.२०२५ | अंक नं. २७५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
**बस्ता बांधायला यायचं हं!**
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
**राजपाल™**
संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

SAMSUNG
नगरकरांची पहिली पसंती.. राम एजन्सी
47 प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!
THE GREAT REPUBLIC DAY OFFER

F15 5G: 4GB/128GB ₹12,499/- ; 6GB/128GB ₹13,499/- ; 8GB/128GB ₹14,499/-
A16 5G: 6GB/128GB ₹15,499/- ; 8GB/128GB ₹16,999/- ; 8GB/256GB ₹19,999/-
A35 5G: 8GB/128GB ₹25,999/- ; 8GB/256GB ₹28,999/-
A55 5G: 8GB/128GB ₹33,999/- ; 8GB/256GB ₹36,999/- ; 12GB/256GB ₹39,999/-
S24 5G: 8GB/128GB ₹54,999/- ; 8GB/256GB ₹60,999/- ; 8GB/512GB ₹72,999/-
*T & C Apply
राम एजन्सी
प्रशस्त पार्किंग सुविधा
सावेडी, अहिल्यानगर
0241 - 2419141
CREDIT/DEBIT CARD
*EMI Available

कितीही खा भो! बर्थ डे स्पेशल मेन्यू
✓३० वडे आणि ३० पाव (सोबत शेंगदाणा चटणी मोफत)
₹199/- फक्त
संपर्क 90 111 93 700
**हॉटेल दामुअण्णा**
(सोलापूर हायवे पासून पाच मिनिटाच्या अंतरावर) कानडेमळा, सारसनगर रोड, अ.नगर

सर्व नगरकरांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
स्वच्छ भारत, सुंदर भारत
शुभेच्छुक
**साई टँक क्लिनिंग सर्व्हिसेस**
सोफा क्लीनींग आणि पेस्ट कंट्रोल उपलब्ध आहे.
इशान शेख
(M.Tech. Chemical)
9028330599
9834621600

महेंद्र पेडावाला
**रजवाडी गुजराती थाळी**

दर रविवारी दालबाटी व चुरमाचा बेत...
किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय..
कापड बाजार, अहमदनगर.





**हार्दिक अभिनंदन**

कु रुची समीर ठकरे किंग्स्टन युनिव्हर्सिटी लंडन येथे बी. ई. कॉम्प्युटर नंतर एम. एस. सी. युजर एक्सपिरियन्स डिझाईन (कॉम्प्युटर सायन्स) या विषयात डिस्टींगशन मिळवून उत्तीर्ण झाल्या. कै. बाबासाहेब म्हस्के उर्फ कि. बा. म्हस्केयांची चौथी पिढी शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य मिळवून आपल्या देशाचे व कुटुंबाचे नाव उज्वल करीत आहे. कु रुची या बाबासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फौंडेशन, अहिल्यानगरचे सी. ई. ओ., आर्किटेक्ट, समीर ठकरे, ट्रस्टी डॉ. दिप्ती ठकरे यांच्या कन्या आहेत. ट्रस्टी डॉ. अभितेज म्हस्केएफ आर. सी. एस. आयर्लंड येथून प्रथितयश सांधेरोपण तज्ज्ञ जगतमान्यता मिळवून आपल्यात स्थायिकझाले. म्हस्के कुटुंबीयांचे जागतिककीर्तीबद्दल अभिनंदन.

शुभेच्छुक - * डॉ. सुभाष म्हस्के (मॅनेजिंग ट्रस्टी) * डॉ. सुमती म्हस्के (ट्रस्टी) * डॉ. विवेकरेणे (प्राचार्य, बाबासाहेब म्हस्केहोमिओपॅथिकमेडिकल कॉलेज, हॉस्पिटल ॲण्ड पोस्ट ग्रॅज्युएट) * डॉ. संदीप बढे (प्राचार्य, बाबासाहेब म्हस्के कॉलेज ऑफ फार्मसी. (डी. फार्म, बी. फार्म), * श्री. अजित ववरदार (प्राचार्य, पार्वतीबाई म्हस्के इन्स्टिट्यूट ऑफनर्सिंग (बी. एस. सी. नर्सिंग, आर. जी. एन. एम., आर. ए. एन. एम.) * डॉ. पूनम गायकवाड, * श्रीमती. अलबर शुभांगी आणि प्राध्यापक, शिक्षकव शिक्षकेत्तर यांनी कु रुची यांचे अभिनंदन केले.


# पाहिजेत
बँकिंगमध्ये करियर करण्याची सुवर्ण संधी...

* मॅनेजर : २ जागा
(BCA / BCS/B.COM, पदवीधर, बँक/पतसंस्था अनुभवी व्यक्तीस प्राधान्य)
* क्लार्क कम कॅशियर : ४ जागा
* १२ वी/पदवीधर * संगणकाचे ज्ञान आवश्यक * अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
* शिपाई कम ड्रायव्हर : २ जागा
(दहावी/१२ वी पास, ड्रायव्हिंग लायसन्स व निर्व्यसनी)

**श्री लक्ष्मी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. अ.नगर**
मुख्य कार्यालय : अकोलकर हॉस्पिटल शेजारी, बुरुडगांव रोड, ता.जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)
मो. :-9422840012 / 7020360816
टिप- मुलाखतीसाठी प्रत्यक्ष स्वखर्चाने सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत दि. २७ व २८ जानेवारी रोजी वरील पत्यावर उपस्थित राहावे.
"दैनिक बचत (डेली कलेक्शन)/रिकरिंग(RD)/मुदत ठेव(FD) कमिशन एजंट नेमणे आहेत."






अहिल्यानगरचे मा. महापौर

# संदीपदादा कोतकर

आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

● शुभेच्छुक :

संदिप ठुबे | सुखदेव कोतकर | अमोल ठुबे | प्रविण ठुबे | नितीन आजबे | सोमनाथ सातपुते
रुपेश ओझा | महेश राऊत | रोहित मिसाळ | महेश झारेकर | स्वप्निल कार्ले | सिद्धांत शिंदे
गणेश उरमुडे | मयूर डहाळे | सतिश गिरी

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## अमृतमहोत्सवी प्रजासत्ताक

आपल्याला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले तर २६ जानेवारी १९५० रोजी आपण आपली राज्यघटना स्वीकारून हा दिन गणतंत्र अर्थात प्रजासत्ताक म्हणून साजरा करू लागलो. यादिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रम होतात. तर १५ ऑगस्टला पंतप्रधानांच्या शुभहस्ते लाल किल्ल्यावर ध्वजारोहण केले जाते. यंदाचा प्रजासत्ताक दिन हा अमृतमहोत्सवी! गत ७५ वर्षांचा गोषवारा पाहिल्यास भारत देशाने मोठी व चांगली प्रगती केली आहे. तरीपण १४० कोटी लोकसंख्येच्या भारताला अजून खूप मोठी मजल मारायची आहे. ७५ वर्षांपासून पंचवार्षिक योजना, नितीआयोग, औद्योगिकरण, मोठ्या धरणांची निर्मिती, शेतीतली क्रांती, बँकांचे राष्ट्रीयीकरण, मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार या ठळक गोष्टी दिसून येतात.

विशेषतः ग्लोबलायजेशन स्वीकारल्यापासून आपण खऱ्या अर्थाने जगाच्या बाजारात उतरलो. प्रारंभी अशिक्षित असलेले बहुसंख्य भारतीय आता केवळ सुशिक्षित होत नसून तंत्रसाक्षर व अर्थसाक्षर होत आहे. जनधन योजनेतून करोडो बंधुभगिनी बँकांत आले. डीबीटी योजनेने भ्रष्टाचारास काहीसा आळा बसलाय. तरीपण ६०-७० करोडोंना मोफत अन्नधान्य द्यावे लागणे चिंताजनकच आहे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



संरक्षण, अवकाश, नौदल, रस्ते वाहतूक, स्टार्टअप, शेअर मार्केट यासारख्या विविध क्षेत्रातील घोडदौड आनंददायी आहे. आजमितीस राजकीय अस्थिरता, स्वार्थांधपणा, भ्रष्टाचार, सार्वजनिक बेशिस्त, आयात तूट तुटीचे ताळबंद यावर उपाययोजना होऊन गरीबांच्या उन्नतीसाठी प्रामाणिक कार्य हणे आवश्यक आहे. गणतंत्र दिन चिराय होवो.

# शिक्षकांवर विश्वास नसेल, तर त्रयस्थ यंत्रणेकडे 'दहावी आणि बारावी बोर्डाची परीक्षा' सोपवावी

### शिक्षण विभाग, तुमचा आमच्यावर भरोसा नाय काय!.... शिक्षकांचा प्रश्न, संघटनेचे शिक्षण विभागाला निवेदन

नगर – इयत्ता दहावी व बारावी बोर्डाच्या परीक्षा कॉपीमुक्त करण्याच्या नावाखाली दुसऱ्या शाळेचे केंद्र संचालक, पर्यवेक्षक, शिपाई नियुक्तीच्या निर्णयाला अहिल्यानगर मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर संघटनेच्या वतीने विरोध दर्शविण्यात आला आहे. तर यामुळे परीक्षा काळात निर्माण होणारा गोंधळ, शिक्षकांची धावपळ याची जाणीव करुन देणारे निवेदन माध्यमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर व कार्यालयीन अधीक्षक महावीर धोदाड यांना देण्यात आले.



शिक्षकांवर विश्वास नसेल, तर त्रयस्थ यंत्रणेकडून परीक्षा प्रक्रिया राबवून घेण्याचा इशारा शिक्षण विभागाला निवेदनाद्वारे देण्यात आला.

शिक्षकांवर विश्वास नसेल, तर त्रयस्थ यंत्रणेकडून परीक्षा प्रक्रिया राबवून घेण्याचा इशारा शिक्षण विभागाला देण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष सुनील पंडित, माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, मिथुन डोंगरे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे महेंद्र हिंगे, जिल्हा समन्वयक वैभव सांगळे, ज्ञानदेव बेरड, ए.जी. आचार्य आदी उपस्थित होते.

फेब्रुवारी व मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी व बारावी बोर्डाच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी परीक्षा केंद्रावरील केंद्र संचालक, पर्यवेक्षक व इतर संबंधित शिक्षक, शिक्षकेतर यांची एका केंद्रातून इतर दुसऱ्या केंद्रांत बदल करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहे. यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

शिक्षकांचे मनुष्यबळ अगोदरच अपूर्ण असताना इतर सर्व वर्गाच्या अध्यापनाची अडचण होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. दुसऱ्या विद्यालयातून ऐनवेळी परीक्षेचे नियोजन करायला जाणारे शिक्षक, शिक्षिका व इतर कर्मचारी यांना शाळेची माहिती नसल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. काही केंद्र संचालक नवीन असल्याने गोंधळ होण्याची शक्यता आहे. महिला शिक्षकांना इतर ठिकाणी जाण्यास मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. दिलेल्या परीक्षा केंद्राच्या शालेय परिसराची कर्मचाऱ्यांना माहिती नसल्यामुळे गावगुंडांकडून त्रास होण्याची शक्यता असल्याचे धोके संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आले आहे.

पूर्व सूचना न देता व कोणालाही विश्वासात न घेता घेतलेला हा निर्णय जाचक ठरू शकतो. शिक्षक, कर्मचाऱ्यांवर अविश्वास असल्यास सदर परीक्षा त्रयस्थ संस्थेकडून घेण्याचे निवेदनात म्हंटले आहे.

# नगरजवळ जेऊर गावात बिबट्या पडला विहिरीत

### वन विभानाने स्थानिक नागरिकांच्या मदतीने 'रेस्क्यु ऑपरेशन' राबवून दिले जीवनदान

नगर – नगर शहर परिसरात बिबट्यांचा वावर वाढलेला असून नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या जेऊर गावच्या परिसरात चापेवाडी येथे विहिरीत पडलेल्या बिबट्याला वनविभागाच्या पथकाने स्थानिक नागरिकांच्या मदतीने 'रेस्क्यु ऑपरेशन' राबवत बाहेर कडून जीवदान दिले आहे. २४ जानेवारीला दुपारी ४ ते सायंकाळी ६.३० पर्यंत हे 'रेस्क्यु ऑपरेशन' सुरु होते. बाहेर काढलेल्या बिबट्याला वनविभागाने जंगलात नेवून सोडून दिले आहे.



नगर तालुक्यातील जेऊर जवळ चापेवाडी शिवारात विहिरीत पडलेला बिबट्या छायाचित्रात दिसत असून त्याला पाहण्यासाठी विहिरीभोवती झालेली गर्दी.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, जेऊर गावच्या परिसरात असलेल्या चापेवाडी येथे डोंगराच्या कडेला सुरेश पाटोळे यांच्या शेतातील विहिरीत २४ जानेवारीला दुपारी ४ च्या सुमारास एक बिबट्या पडला. विहिरीत काहीतरी पडल्याचा मोठा आवाज आल्याने परिसरात काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी विहिरीत डोकावले असता त्यांना बिबट्या दिसला. ही माहिती त्यांनी जेऊर मधील वन मित्रांना दिली. वन मित्र सनी गायकवाड, मायकल पाटोळे, सागर पाटोळे, संजय ठोंबरे, शशीकांत पवार यांनी तात्काळ वन विभागाला याची माहिती देत घटनास्थळी धाव घेतली.

त्यावेळी विहिरी भोवती बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. अनेक जण विहिरीतील बिबट्याला दगड फेकून मारत होते. या वनमित्रांसह स्थानिक तरुण दीपक ठोंबरे, अमित नांगरे, सुरज पवार, प्रसाद गोरे, हर्षल तोडमल, सुर्यकांत पवार आदींनी विहिरी भोवती जमा झालेली गर्दी हटवली. त्यानंतर दोरीच्या सहाय्याने लाकडी शिडी विहिरीत सोडली. विहिरीत पाणी मोठ्या प्रमाणावर असल्याने आणि त्यात आधाराला काहीच नसल्याने बिबट्या पाण्यात पोहून थकला होता. या तरुणांनी सोडलेल्या लाकडी शिडीचा आधार बिबट्याने घेत त्यावर तो बसला.

काही वेळात वन विभागाचे पथक त्या ठिकाणी दाखल झाले. या पथकाने स्थानिक तरुणांच्या सहाय्याने एक पिंजरा विहिरीत सोडला. पोहून थकलेला बिबट्या लगेच त्या पिंजऱ्यात बसला. त्यामुळे त्याला विहिरीतून वर काढणे सोयीचे झाले. त्याला वर काढल्यानंतर तो पिंजरा वनविभागाच्या पथकाने गाडीत घालून नेला. या बिबट्याला लांब जंगलात नेवून निसर्गात मुक्त केले जाणार असल्याचे वनविभागाच्या वतीने सांगण्यात आले.

यावेळी राबविलेल्या रेस्क्यु ऑपरेशनमध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे, वनपाल मनेष जाधव, वनरक्षक विजय चेमटे, भागीनाथ पंचमुख, वाहनचालक संदिप ठोंबरे, अक्षय ससे आदी सहभागी झाले होते.

## बिबट्याकडून पाळीव प्राण्यांच्या शिकार

या परिसरात अनेक दिवसांपासून बिबट्यांचा वावर आहे. ज्या परिसरात बिबट्या विहिरीत पडला त्या परिसरात गेल्या काही दिवसांत बिबट्याने शेतकरी, मेंढपाळ यांच्या अनेक पाळीव प्राण्यांची शिकार केलेली आहे. यामध्ये भिवा घुले या मेंढपाळाच्या ३ मेंढ्या, चांगदेव कोकाटे या शेतकऱ्याची गाय, बापू म्हस्के यांची शेळी तसेच एका पाळीव कुत्र्याचा बिबट्यांनी फडशा पाडलेला आहे. वन विभागाने एक बिबट्या येथून पकडून नेला असला तरी या परिसरात अनेक बिबटे असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

# २६ जानेवारीला भुईकोट किल्ला परिसरात वाहतूक मार्गात बदल

नगर – प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने २६ जानेवारीला भिंगार कॅम्प पोलीस ठाणे हद्दीत असलेला ऐतिहासिक भुईकोट किल्ला नागरीकांना पाहण्यासाठी खुला करण्यात येणार आहे. या दिवशी परिसरातील नागरीक, लहान मुले, महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहतील असा अंदाज आहे. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी व वाहतूक कोंडी होण्याची शक्यता गृहीत धरून अहिल्यानगर- पाथर्डी महामार्गावरील भूईकोट किल्ला व परिसरात वाहतुकीचे नियमन करण्यात आले आहे.

नागरिकांची गैरसोय होऊ नये तसेच वाहतुकीचा सुरळीत प्रवाह राखण्यासाठी पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३ (१) (ब) नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून २६ जानेवारीला सकाळी ९ वाजल्यापासून ते सायं. ६ वाजेपर्यंत खालील वाहतूक मार्ग बदल लागू केले आहेत.

अहिल्यानगर शहराकडून पाथर्डीकडे जाणारी वाहने : चाँदणी चौक- निंबोडी- सारोळा बध्दी- बायपास लिंक रस्ता मार्गे पाथर्डीकडे तसेच पाथर्डीहून अहिल्यानगर शहरात येणारी वाहनेः चाँदबीबी महाल- बायपास लिंक रस्ता- सारोळा बध्दी- जामखेड रस्ता - निंबोडी - चांदणी चौक मार्गे जातील. भुईकोट किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांचे खासगी वाहने, रुग्णवाहिका, अग्निशामक दल, शासकीय वाहने, तसेच स्थानिक प्रशासनाच्या आत्यावश्यक सेवांच्या वाहनांना या नियमातून सूट देण्यात आली आहे.

# भवानीनगर येथून बेपत्ता झालेल्या तरुणाचा अखेर मृतदेह आढळला

नगर – मार्केट यार्ड पाठीमागील भवानीनगर येथून बेपत्ता झालेल्या २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह भवानीनगर परिसरात असलेल्या वेअर हाऊसच्या पाठीमागे २४ जानेवारीला दुपारी १२.४० च्या सुमारास मिळून आला आहे. इर्शाद मुजाहिद सय्यद (रा. भवानी नगर, वेअर हाऊस गोडावून समोर) असे या तरुणाचे नाव आहे.



इर्शाद सय्यद

इर्शाद सय्यद हा २० जानेवारीला महात्मा फुले चौकातून चक्कर मारुन येतो, असे सांगुन घराबाहेर गेला होता तो पुन्हा घरी परतला नव्हता. याबाबत त्याचे वडील मुजाहिद सय्यद यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. या वरून पोलिसांनी हरवल्याची नोंद केली होती.

अखेर बेपत्ता झालेला इर्शाद हा भवानीनगर येथे वेअर हाऊसच्या पाठीमागे २४ जानेवारीला दुपारी बेशुद्ध अवस्थेत मिळून आला. त्याचे चुलते तोफिक हरुण सय्यद यांनी त्यास उपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. बट्ठुळे यांनी उपचारापूर्वीच इर्शाद हा मयत झाल्याचे घोषित केले. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. मृत इर्शाद याच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, चुलते असा परिवार आहे.

# नगर जिल्ह्यात भाजपाचे ७ लाख ५२ हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट्य

### संघटन बांधणीत योगदान देणाऱ्यांचाच पदे देताना होणार विचार : प्रदेश महामंत्री विजय चौधरी

नगर – नगर जिल्ह्यात भाजपाचे ७ लाख ५२ हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट्य असून आतापर्यंत केवल १ लाख २५ हजार सदस्य नोंदणी झालेली आहे. प्रत्येक विधानसभा मतदार संघात किमान ७० हजार सदस्य नोंदणी होणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील अकोले, नेवासा, श्रीगोंदा तालुक्यात सर्वात कमी सदस्य नोंदणी झालेली आहे. येत्या ३० जानेवारी पर्यंत सदस्य नोंदणी वाढवा, यामध्ये जे जास्त योगदान देतील त्यांचाच आगामी शासकीय समित्यांवरील पदे तसेच जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणूकीच्या उमेदवारी देताना विचार केला जाणार असल्याचे भाजपाचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी नगर मध्ये बोलताना स्पष्ट केले.



भाजपाच्या नगर मध्ये आयोजित संघटन पर्व २०२५ सदस्य नोंदणी अभियान बैठकीत बोलताना भाजपाचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी समवेत भाजपाचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगर शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर आदी.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळविल्यानंतर भारतीय जनता पक्षाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर संघटन पर्व २०२५ सदस्य नोंदणी अभियान सुरु केले आहे. या अभियानाबाबत अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी व अहिल्यानगर लोकसभा मतदार संघाची जिल्हाव्यापी बैठक २५ जानेवारीला सकाळी १० वाजता अहिल्यानगर शहरातील टिळक रोड वरील हॉटेल राज पॅलेस येथे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस भाजपाचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी हे प्रमुख मार्गदर्शन म्हणून उपस्थित होते. यावेळी भाजपाचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगर शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, सदस्य नोंदणी संयोजक प्रशांत मुथा, संतोष कुलकर्णी, दादासाहेब जाधव यांच्या सह भाजपाचे जिल्हा पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, मोर्चा, आघाडी पदाधिकारी आजी माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, विस्तारक, शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रदेश महामंत्री विजय चौधरी म्हणाले, राज्यात दीड कोटी सदस्य नोंदणी करावयाची असून त्यापैकी ६५ लाख नोंदणी पूर्ण झाली आहे. संघटन बांधणी ही पक्षासाठी महत्वाची सर्वांनी त्यासाठी प्रयत्न करावेत. संघटनेच्या या महत्वाच्या बैठकीकडे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी पाठ फिरवल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. व्यक्ती पेक्षा पक्ष मोठा आहे. पक्ष आहे म्हणून लोकप्रतिनिधी असतात याचा विसर कोणीही पडू देवू नये, लोकप्रतिनिधींनी पक्षाच्या कार्यक्रमासाठी वेळ देणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. या पुढील काळात जो पक्ष संघटनेसाठी वेळ देईल त्याचाच पक्ष विचार करणार असल्याचेही चौधरी म्हणाले.

## रावसाहेब लांडे यांचे अल्प आजारात वृद्धापकाळाने निधन



नगर – नालेगाव भागातील रहिवासी रावसाहेब बाबुराव लांडे (वय ७५) यांचे २१ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ भाऊ, २ मुली, १ नातु, २ पणतु असा परिवार आहे.

## कांताबाई शिंदे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील झारेकर गल्ली येथील रहिवासी कांताबाई एकनाथ शिंदे (वय ८५) यांचे १९ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, ३ पुतणे, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

## सुमनबाई शिवरकर यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील सुमनबाई तुकाराम शिवरकर (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. वाकडी रोड येथील यश लॉन्सचे मालक अशोक (पाशा) शिवरकर यांच्या मातोश्री होत.

## संतोष फुटाणे यांचे अल्पशः आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील संतोष देविदास फुटाणे (वय ५५) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. टेलरिंग व्यावसायिक सोमनाथ फुटाणे व नागनाथ फुटाणे यांचे थोरले बंधू, चि.अमोल फुटाणे यांचे वडील होत.

# विधानसभा निवडणुकीचा निकाल अनाकलनीय : मोहन जोशी

नगर – महाराष्ट्रात नोव्हेंबर २०२४ मध्ये विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. निवडणुकीचे निकाल पाहता ते अनाकलनीय, आश्चर्यकारक, अविश्वसनीय व काहीतरी गडबड असल्याचे दिसते. राज्यातील राजकीय परिस्थिती ही सत्ताधारी भाजपा महायुतीच्या विरोधात होती. सहा महिन्यापूर्वीच लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचे पानिपत झाले होते. महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले होते. अवघ्या सहाच महिन्यात हे चित्र पूर्णपणे पालटले जाऊ शकते, यावर कोणाचाच विश्वास बसणार नाही. निवडणूक आयोगाने आपल्या प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशी मागणी काँग्रेसचे माजी आमदार तथा प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी केली आहे.



अहिल्यानगर शहर व ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य आयोजिलेल्या बैठकीत बोलताना माजी आ. मोहन जोशी आदी.

अहिल्यानगर शहर व ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून निवडणूक आयोगाच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. त्याबाबतचे लेखी निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे. याबाबत शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, ज्येष्ठ नेते घन:श्याम शेलार, अल्पसंख्याक अध्यक्ष अनिस चुडीवाला, माजी मनपा विरोधी पक्षनेते दशरथ शिंदे, माथाडी विभाग अध्यक्ष विलास उबाळे, मागासवर्गीय विभाग प्रदेश सचिव सुनील क्षेत्रे, अल्पसंख्याक प्रदेश पदाधिकारी निजाम जहागिरदार, महिला उपाध्यक्ष आशाताई लांडे, शहर जिल्हा सचिव शंकर आव्हाड, युवक उपाध्यक्ष विकास भिंगारदिवे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

मोहन जोशी म्हणाले की, निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र संस्था असून भारतीय राज्यघटनेने निष्पक्ष निवडणुका घेण्यासाठी या संस्थेची स्थापना केली आहे. राज्यघटनेने आयोगाला मोठे अधिकार दिलेले आहेत. देशातील निवडणुका मुक्त आणि निष्पक्षपणे पार पाडण्याची जबाबदारी आयोगाची आहे. निवडणुकीत मतदार हा राजा असतो. परंतु मागील काही वर्षातील आयोगाची भूमिका पक्षपाती दिसत आहे.

## सहाच महिन्यात ५० लाख मतदारांची वाढ कशी?

यावेळी जोशी म्हणाले, मतदार याद्यांमध्ये घोटाळा करण्यात आला. या विरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार करूनही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर निवडणूक निकालातही घोटाळा करण्यात आला. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या सहाच महिन्याच्या अंतरात तब्बल ५० लाख मतांची वाढ कशी झाली ? यामागील सत्य जनतेसमोर आले पाहिजे.

## ते ७६ लाख मतदान अचानक कसे वाढले?

मतदाना दिवशी संध्याकाळी ५ वाजता जाहीर केलेली व आयोगाने दुसऱ्या दिवशी सकाळी जाहीर केलेली मतदानाची टक्केवारी यामध्ये मोठी तफावत आहे. यातही ७६ लाख मतदान वाढलेले दाखवले आहे. सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची व्यवस्था होती. त्यामुळे मतदार यादीतील घोळ, रात्रीच्या अंधारात वाढलेले ७६ लाख मतदान याचे पुरावे निवडणूक आयोगाने द्यावेत, अशी मागणी काँग्रेस पक्षाने केली असता आजपर्यंत ही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे अचानक एवढ्या मोठ्या संख्येने मते वाढली कशी, असा सवाल मोहन जोशी यांनी केला. लोकशाहीचे रक्षण आणि मतदारांचा आदर सन्मान तसेच विश्वास कायम ठेवून विश्वासार्हता अबाधित राहील याकडे निवडणूक आयोगाने लक्ष द्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे काँग्रेसने केली असल्याचे जोशी यावेळी म्हणाले.

## बाळासाहेब थोरात यांचा पराभव धक्कादायक

मागील सलग ४० वर्ष बाळासाहेब थोरात हे राज्याच्या विधानसभेत जनतेच्या भरघोस पाठिंब्याने निवडून जात होते. त्यांची सतत सर्वसामान्य माणसाशी असणारी बांधिलकी, संवाद, थेट संपर्क अत्यंत मजबूत होता. अनेक वर्ष राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांनी काम केले. त्या माध्यमातून आपल्या मतदारसंघांमध्ये भरघोस निधी आणत विकास कामांचा डोंगर त्यांनी उभा केला होता. असे असतानाही त्यांचा पराभव हा धक्कादायक आणि अविश्वसनीय आहे. अजूनही संगमनेर विधानसभा मतदारसंघासह राज्याला थोरात यांचा पराभव हे न उलगडलेले कोडे असल्याचे यावेळी मोहन जोशी म्हणाले. एक प्रकारे अप्रत्यक्षरीत्या त्यांनी निवडणुक प्रक्रियेतील पारदर्शकते बद्दल संशय यावेळी व्यक्त केला.

# गृहिणी

## आरोग्य

### याने राहिल कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित

आजच्या धावपळीच्या जीवनात खाण्याच्या सवयी बिघडल्या आहेत आणि वाईट कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढणे ही एक सामान्य समस्या बनली आहे. तुमच्या स्वयंपाकघरातच एक अशी रेसिपी आहे जी वाईट कोलेस्ट्रॉल नष्ट करू शकते? हो, आपण आवळा आणि गाजराच्या रसाबद्दल बोलत आहोत! आवळ्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि फायबर खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात, तर गाजरमध्ये असलेले जीवनसत्त्वे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात.

## पाककला

### रवा आप्पे

**साहित्य :** १ कप रवा, १ कप दही, १/२ कप पाणी, १ छोटा कांदा, १ गाजर, १ हिरवी मिरची, १/४ कप कोथिंबीर, मीठ चवीनुसार, १/२ मोहरी, ८-१० कढी पत्ता, २ चमचे तेल, १/२ चमचे बेकिंग सोडा

**कृती :** सर्वात आधी एका भांड्यात रवा घ्यावा. त्यात समान प्रमाणात दही घालावे. जर घट्ट वाटत असेल तर त्यात थोडे पाणी घालून पीठ तयार करावे. आता अर्धा तास भिजत ठेवावे. रवा फुगल्यावर सर्व चिरलेल्या भाज्या त्यात मिक्स कराव्या. यानंतर मीठ घालावे. आता तुम्हाला फोडणी तयार करण्यासाठी एका कढईत तेल गरम करून मोहरी घालावी. मोहरी तडतडायला लागली की त्यात कढीपत्ता घालावा. आता हा तडका पिठात मिक्स करावा व शेवटी बेकिंग सोडा घालवा व मिक्स करून घ्यावे. आता अप्पे पात्र गरम करून आणि ब्रशच्या मदतीने त्यात तेल लावावे. तेल लावल्यानंतर चमच्याच्या साहाय्याने पीठ भरावे. झाकून मध्यम आचेवर शिजवावे.

## वास्तू

### तळघरासंबंधी

✻ दक्षिण व पश्चिमेतील तळघरात केवळ धान्यसाठा किंवा जड सामानाचे स्टोअरेज अतिशय उत्तम असते.

✻ तळघराची उंची ९ फुटांपेक्षा जास्त नसावी.

✻ केवळ ईशान्य दिशेतच वरचा मजला घेतल्यास या वास्तूत प्रारंभीच्या काळात थोडी प्रगती होते, परंतु नंतर सर्व कामकाज एकदम ठप्प होते.

## सल्ला

पुरी किंवा भजी तळताना तेलात मीठ घातल्यास भजी किंवा पुरी कमी तेल शोषतात.

## सौंदर्य

दुसऱ्या दिवशी मेंदी सुकल्यावर तव्यावर लवंगा गरम करून त्याची वाफ द्यावी. म्हणजे मेंदी छान रंगते. + त्यानंतर तेल लावून मेंदी काढून टाकावी व शक्यतो पाण्यात हात घालू नये.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २६ जानेवारी २०२५

**गणराज्य दिन, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, ज्येष्ठा ०८।२६, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपले धाडस वाढेल. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. अनुकूल वार्ता मिळतील. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील.

**वृषभ** : आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोन प्रदर्शित कराल. आपल्या शत्रूंवर आपला प्रबळ प्रभाव राहील.

**मिथुन** : आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडाल.

**कर्क** : इतर लोकांबरोबर काही विषयांवर संमती द्यावी लागू शकते. आपल्या व्यवसायात काहीतरी चांगले घडून येणार आहे.

**सिंह** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. नोकरदार व्यक्तींना कामात अनुकूल वातावरण मिळेल.

**कन्या** : मित्रांचा पाठिंबा मिळेल. पत्नीशी बोलल्यानंतर मूड छान होईल. आपली इच्छा असेल तर दिवास्वप्नही खरी ठरू शकतात. राजकीय क्षेत्रात यश मिळेल.

**तूळ** : महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. शत्रू पराजित होईल. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहिल.

**वृश्चिक** : विरोधक नुकसान पोहोचवण्याचा प्रयत्न करतील. आर्थिक विषयांमध्ये सावध रहाल. पैशासंबंधी अडचणी दूर होतील.

**धनु** : शत्रू पराभूत होतील. मानसिकता चांगली राहील. आरोग्य साथ देईल. धार्मिक गोष्टींसाठी वेळ द्याल.

**मकर** : आनंदाची बातमी मिळेल. निर्णय घेण्यापूर्वी दोनदा विचार केल्याने फायदा. मित्र-मैत्रिणींशी मनमोकळेपणाने संवाद साधाल.

**कुंभ** : प्रेमसंबंधांमध्ये आवश्यक प्रगती होईल. आपल्या धाडसात वाढ होण्याची शक्यता आहे.

**मीन** : कलाक्षेत्रातील लोकांना अनुकूल परिस्थिती मिळेल. नोकरदार वर्गाचे काम सुरळीत चालू राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### एक जाहिरात

रम्य एकांत स्थळी विश्रांती घ्या. एकांतवासासाठी हे स्थळ खरोखरच अतिशय योग्य आहे. त्यामुळेच दूरदूरच्या देशविदेशातूनही लोकांच्या झुंडीच्या झुंडी येथे येऊन राहतात. आपणही या. **भेटा-** व्यवस्थापक, प्रशांत भुवन.

## शब्दगंध क्र. ७१०० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | ५ | |
| | ■ | ६ | | | | | ■ |
| ७ | | ■ | | ■ | ८ | | ९ |
| | ■ | १० | | ११ | ■ | ■ | |
| ■ | १२ | | ■ | १३ | १४ | १५ | |
| १६ | | | १७ | ■ | १८ | | ■ |
| १९ | | ■ | २० | २१ | | ■ | २२ |
| ■ | २३ | | ■ | २४ | | | |

**आडवे शब्द :-** १) व्यवस्था; रचना; तरतूद ४) खिडकी; वातायन; झरोका ६) दाहक; सणसणीत ७) झाडाचे पान ८) लागलीच; त्वरेने; थेट १०) डाव्या हाताने काम करणारा १२) एक मूल्यवान लाकूड व त्याचे झाड १३) जीव गेलेला; प्राण गेलेला १६) रम्य; सुंदर १८) सूक्ष्म वर्तुळाकर अंश किंवा तुकडा (धान्य वगैरेचा) १९) पतीची किंवा पत्नीची आई २०) उत्तर भारतातील थंड हवेचे एक ठिकाण २३) दारू; मदिरा २४) थंडीपासून बचाव करण्यासाठी कानाला गुंडाळतात ते लोकरीचे लांबट वस्त्र

**उभे शब्द :-** १) निर्वंश; सत्यानाश २) चपला; दामिनी; विद्युत ३) केळीसाठी प्रसिद्ध असलेला महाराष्ट्रातील एक जिल्हा ४) गाळले जाणारे (तेल धान्य, ऊस) ५) लवकर न तुटणारे; लवचीक ९) सोपे नसलेले; अवघड १०) डागण्याचे हत्यार ११) त्वेष; क्रोध १२) नि:शब्द शांतता १४) त्रास; दु:ख; यातना १५) जीव; हृदयस्थ वायू; अत्यंत प्रिय व्यक्ती १६) धरती; वसुंधरा; पृथ्वी १७) मृत्यूचा देव २१) नाव; गंधाचा टिळा २२) चिंता; काळजी

### शब्दगंध क्र. ७०९९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | क | स्मा | त | ■ | मो | ग | ल |
| ट | ■ | र | ज | त | ■ | त | ग |
| ■ | का | क | डी | ■ | म | ■ | व |
| पा | र | ■ | ज | ल | त | रं | ग |
| प | खा | ल | ■ | स | ल | ग | ■ |
| ■ | न | व | ल | ■ | व | ■ | पा |
| दा | दा | ■ | ग | स्त | ■ | क | स |
| ता | र | ■ | त | र | फ | दा | री |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : मैत्री म्हणजे साध्य-असाध्य न बघता अजीवन अबाधीत राहणारे बंधन आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### उगवताना किंवा मावळताना सूर्य रंगीत का दिसतो?

आपण जेव्हा सकाळी किंवा संध्याकाळी सूर्य बघतो त्या वेळी तो आपल्याला तांबूस सोनेरी दिसतो. पण जसजसा तो डोक्यावर येतो तसतसे त्याच्याकडे बघणेही अवघड होते, तसेच तो भगभगीत पांढरा दिसू लागतो. त्यामुळे त्याच्याकडे बघण्याचे आकर्षणही उरत नाही. सूर्य जेव्हा आपल्या डोक्यावर असतो तेव्हा त्याचे किरण सरळ आपल्याकडे येतात. ते हवेत शिरताना त्यांचे विशेष वक्रीभवन होत नाही आणि वर्णपृथक्करणसुद्धा होत नाही. संध्याकाळी पृथ्वीच्या फिरण्यामुळे जेव्हा सूर्य क्षितिजाजवळ गेल्यासारखा वाटतो; किंवा उगवताना सूर्य क्षितिजावरून वर आल्यासारखा वाटतो, तेव्हा आपल्याजवळ पोहोचायला सूर्यकिरणांना बरेच जास्त अंतर कापावे लागते. याशिवाय वाटेत हवेतले धूलीकण, वाफ, धुराचे कण यांच्यावर तिरक्या पडणाऱ्या सूर्यकिरणांचे वक्रीभवन होतेच, शिवाय त्यांचे वर्णपृथक्करणही होते. सूर्यप्रकाश हा सात रंगांचा मिळून बनलेला असतो, हे आपल्याला माहीत आहेच. ते रंग आपल्याला सारख्या प्रमाणात मात्र दिसत नाहीत. यामुळे सूर्य उगवताना किंवा मावळताना तांबूस सोनेरी दिसतो.

### अकबरचा पोपट

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा बादशाह अकबर बाजारात फिरायला गेले होते. तिथे त्यांना एक पोपट दिसला, जो खूप सुंदर होता. त्याच्या मालकाने त्याला अनेक चांगल्या गोष्टी शिकवल्या होत्या. हे पाहून बादशहा अकबर खूश झाले. त्यांनी तो पोपट विकत घेण्याचे ठरवले. पोपट खरेदी करण्याच्या बदल्यात बादशाह अकबरने मालकाला चांगली किंमत दिली. ते त्या पोपटाला राजवाड्यात घेऊन आले. पोपट राजवाड्यात आणल्यानंतर बादशहा अकबरने त्याची खूप काळजी घेण्याचे ठरवले.

आता जेव्हा जेव्हा अकबर त्याला काहीही विचारायचे तेव्हा तो लगेच उत्तर द्यायचा. अकबर खूप आनंदी होई. दिवसेंदिवस तो पोपट त्यांना त्याच्या जीवापेक्षाही प्रिय होत गेला. त्यांनी त्यांच्या राजवाड्यात राहण्यासाठी शाही व्यवस्था करण्याचे आदेश दिले. बादशहाने आपल्या नोकरांना सांगितले, 'या पोपटाची विशेष काळजी घ्या.' पोपटाला कोणत्याही प्रकारची वेदना होऊ नयेत. ते असेही म्हणाले, की, 'हा पोपट कोणत्याही परिस्थितीत मरता कामा नये.' जर कोणी त्यांना पोपटाच्या मृत्यूची बातमी दिली तर ते त्या व्यक्तीला फाशी देतील.'

राजवाड्यात पोपटाच्या राहण्याची विशेष काळजी घेतली जात होती. मग एके दिवशी अचानक अकबराचा लाडका पोपट मरण पावला. आता, राजवाड्यातील नोकरांमध्ये गोंधळ उडाला की हे बादशहा अकबराला कोण सांगेल, कारण अकबराने म्हटले होते की जो कोणी त्यांना पोपटाच्या मृत्यूची बातमी देईल, ते त्याला फाशी देतील. आता नोकरांना काळजी वाटू लागली. खूप विचार केल्यानंतर त्याने हे बिरबलाला सांगायचे ठरवले. सर्वांनी बिरबलाला संपूर्ण कहाणी सांगितली. मृत्युची बातमी देणाऱ्या व्यक्तीला बादशहा अकबर मृत्युदंड देईल असेही सांगण्यात आले. हे ऐकून बिरबलने ही बातमी अकबराला सांगण्याचे मान्य केले. अकबराला याची माहिती देण्यासाठी तो राजवाड्यात गेला. बिरबल अकबराकडे गेला आणि म्हणाला महाराज एक दुःखद बातमी आहे. बादशहाने विचारले काय झाले सांगा? बिरबल म्हणाला महाराज, तुमचा लाडका पोपट काही खात नाही, पीत नाही, काही बोलत नाही, तेव्हा अकबर म्हणाले तो डोळे उघडत आहे का, काही हालचाल करत नाहीये का, अकबर रागाने म्हणाले काही नाही? तुम्ही लगेच का म्हणत नाही की तो मेला आहे? बिरबल म्हणाला, 'हो महाराज, पण हे तुम्हीच सांगितले, मी नाही. आता बादशहा अकबराला आपले बोलणे आठवले. अकबरही काहीही बोलू शकला नाही. अशाप्रकारे, बिरबलाने मोठ्या चातुर्याने आपले आणि नोकरांचे प्राण वाचवले.

तात्पर्य : बुद्धीचा वापर करून कोणतीही समस्या सोडवता येते.



## रहमते दर्शन (भाग - १)

### मेरे मेहेरबान

इस बार जब मैं गेट पर पहुँचा तो महाराज जी ने मुझे फिर बुला लिया। इस बार वे बोले, गुरबक्शजी, लाइब्रेरी की किताबों की बड़े अच्छे तरीके से देखभाल करना। ये किताबें तुम्हारी ज़िन्दगी से भी कीमती है। उसके पश्चात उन्होंने अपना दया-मेहर से भरा हाथ मेरे सिर पर रखा और प्रसाद से भरा एक बड़ा थैला मुझे दिया। एक बार लाइब्रेरी में काम करते हुए महाराज जी ने मुझसे 'शेरे पंजाब, गुरु नानक की पंच शती' नामक उर्दू पत्रिका लाने के लिए कहा। मैंने और लाइब्रेरी में कार्यरत मेरे साथियों ने उस पत्रिका को ढूँढने की भरसक कोशिश की। परन्तु वह पत्रिका हमें नहीं मिली। मैंने महाराज जी से अपनी असफलता के बारे में कहा। वे थोड़ा मौन रहे। और उसके पश्चात उस पत्रिका को उस कमरे की पड़छत्ती में ढूँढने के लिए कहा, जहाँ पर वे बैठा करते थे। हम पहले भी इस स्थान को कई बार टटोल चुके थे, परन्तु हमारे प्रयत्न विफल रहे थे। महाराज जी के निर्देशानुसार हमने इस स्थान को फिर से खोजा। हमारे आश्चर्य का ठिकाना नहीं रहा। जब हमने देखा कि वह पत्रिका रज़ाइयों के नीचे पड़ी थी।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### दिमाग की शक्ती

जाएंगे। आप का योग बहुत अच्छा लगेगा। हमें जीवन में वही मिलता है जिसे हम सहन करते हैं अर्थात उसी पर सोचते रहते हैं, आहत होते रहते हैं, उसे बदलते नहीं हैं। यदि हम दूसरे को अपना अपमान करने की अनुमति देते हैं तो हमारा अपमान होता है। जैसे ही कोई अपमान करें, तुरंत मन में भगवान को या अपने स्नेही व्यक्ति को, बच्चों को या अन्जान लोगों को देखो जो आप का सम्मान करते हैं। यदि हम दुर्व्यवहार को सहन करते हैं अर्थात मन में कहते रहते हैं हाय मेरे से इतना दुर्व्यवहार, तो हमारे साथ दुर्व्यवहार होता है। तुरंत कल्पना में भगवान के गुणों का सिमरन करें या मन में ऐसे लोगों को देखे जो आप के साथ बहुत मिठास से बोल रहें हैं। अगर हम सोचते हैं कि ज्यादा काम करना और कम वेतन पाना ठीक है, तो ज्यादा काम मिलेगा। जो निमित व्यक्ति है उसे मन से प्यार दो, सम्मान दो, तब वह आप को स्थूल काम कम देगा और स्मार्ट काम देगा, जिस से आप को कम कार्य करना पड़ेगा और वेतन ज्यादा मिलेगा। इसके साथ साथ अपने दिमाग को विकसित करने के

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'प्राणवायू दाता...'

प्रत्येक व्यक्तीला जीवनात वेगवेगळ्या भूमिका कराव्या लागतात. आपल्याला मिळालेली भूमिका प्रामाणिकपणे करणं हे आपलं कर्तव्य आणि जबाबदारी आहे. माझी भूमिका 'साहित्य सहवास' च्या संदर्भात प्रामाणिकपणे बजावत असतांनाच दैनंदिन जीवनातील भूमिकासुध्दा प्रामाणिकपणे बजावत आहे. आपण, आपली भूमिका बजावत असतांना, इतरांची भूमिकाही समजुन घेणं तेवढंच महत्वाचं आहे. निसर्गाच्या सहवासात जाण्याचीही भूमिका अधुन-मधुन बजवायची. निसर्ग अर्थातच परमेश्वर. निसर्गाची आराधना करणं, निसर्गाविषयी कृतज्ञता व्यक्त करणं अत्यंत महत्वाचं आहे. निसर्गाने मनुष्याला, पशु, पक्षी, प्राण्यांना भरभरुन दिल आहे, देतो आहे, ह्यापुढेही देणारंच आहे. निसर्गाने मनुष्याला जपलं-सांभाळलं, वाढवलं आहे, वाढवतोही आहे. मनुष्य प्राणवायुशिवाय जगुच शकणार नाही. प्राणवायु देण्याची भूमिका झाडं असंख्य वर्षांपासून प्रामाणिकपणे बजावत आहेत. काही घेण्यासाठी आपण पैसे अथवा वस्तु देतो.

झाडं प्राणवायु देतांना आपल्याकडुन काहीच घेत नाहीत. समजा झाडांनी प्राणवायु देतांना रक्कम घेतली असती तर? समजा तुम्हाला २० वर्ष जगायचं आहे ह्यासाठी अमुक एवढी रक्कम, तुम्हाला ५० वर्ष जगायचं आहे ह्यासाठी अमुक एवढी रक्कम असं करण्याची वेळ आपल्यावर आली असती तर ? निसर्गनियम असा आहे की जे विनासायास, विना पैश्यांचं आपल्याला मिळतं त्याचं मोल, आपल्याला कधीच समजत नाही. माझ्याजवळचं मी, फुकट कितीजणांना देतो? काय देतो ? ह्याची यादी एकदा लिहायला घ्या. मला फुकट काय - काय मिळतं? ह्याचीही यादी लिहायला घ्या. जगण्यासाठी आवश्यक असलेला प्राणवायु, झाडं आपल्याला फुकट देतात. ह्याबदल्यात आपण सर्वजण झाडांना काय देतो? आपण झाडांना काहीही देत नाही. झाडं आपल्याला पानं, फुलं, फळं, औषधी वनस्पती, सावली देतात, प्राणवायु देतात.

पक्ष्यांना घरटं बांधण्यासाठी जागा देतात. देणं हा झाडांचा गुण आपण कधी आत्मसात करणार आहोत? झाडांची कत्तल करणाऱ्यांना कृतघ्न हा शब्दच योग्य आहे. झाडं आपल्याला प्राणवायु देऊन आपला जीव वाचवतात म्हणूनच मी झाडांना प्राणवायुदाता म्हणतो. निस्वार्थ भावनेनं देणं एवढं सोप्पं नसतं. पैश्यांच्या बाबतीत म्हणाल तर लाख रुपये दरमहा कमावणारे काही महाभाग एक रुपयासुध्दा दान करत नाहीत तर एखादा दिवसभर काबाडकष्ट करुन काही रुपये मिळवणारी व्यक्ती आपल्या घासातला घास गरजुला देतो. दाता होणं प्रत्येकाच्या नशिबात नसतं. दाता होण्यासाठी मन तेवढं मोठ्ठे असावं लागतं. प्राणवायुदाता झाडांचे उपकार आपण कदापिही फेडु शकणार नाही. झाडांच्या ऋणात रहायला हवं. झाडांसाठी प्राणवायुच्या बदल्यात आपण काय करु शकतो? आपण झाडं लाऊन, झाडांविषयीची कृतज्ञता व्यक्त करु शकतो. फोटोसेशन पुरते झाडं लावणं काहीही उपयोगाचं नाही. झाडं लावलीच पाहिजेत, ती जगवलीच पाहिजेत. अगदी साधं उदाहरण घेऊया. एखाद्या पालकाने, त्याच्या लहान पाल्याच्या वाढदिवसानिमित्त अथवा कोणत्याही आनंदाप्रित्यर्थ एक झाड लावलं, पाणी देऊन सदर झाड जगवलं तर खूपच चांगलं होईल.

पाल्याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रत्येक वाढदिवसाला दोन झाडं लावली, जगवली तर खुपच छान होईल. पाल्य मोठा झाल्यानंतर स्वतःच्या वाढदिवसाला दरवर्षी दोन झाडं लावुन जगवु लागला तर पन्नासवर्ष वय होईपर्यंतचा हिशोब धरला तर शंभर झाडं होतील. हे असं प्रत्येक पालकाने केलं तर प्रत्येक पालकाला आनंद होईल तसं झाडांना अत्यानंद होईल. झाडांविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी झाडं लावणाऱ्या, झाडं जगवणाऱ्या व्यक्तीच्या ह्या कृतीचा झाडाला आनंद होईनच. झाडं लावणं आणि लावलेली झाडं जगवणं ही आजच्या, उद्याच्याही काळाची गरज आहे हे आज आपण समजुन-उमजुन घेतलंच पाहिजे. गेल्या काही वर्षांपासून रक्षाबंधन दिनी झाडांना राख्या बांधल्या जातात. खऱ्या अर्थाने आपलं जगणं-जीवन समृध्द करणाऱ्या झाडांविषयीची हीसुध्दा कृतज्ञता आहे.

मानवी आरोग्यास घातक असणारा कार्बनडाय ऑक्साईड शोषुन, जगण्यासाठी आवश्यक असणारा ऑक्सिजन देणाऱ्या झाडांचे अर्थात निसर्गाचे ऋण आपण कधीच फेडु शकणार नाही. नियमितपणे निसर्गाच्या सहवासात गेलो तरंच निसर्गाविषयी आवड निर्माण होईल, प्रेमाचे नाते दृढ होईल. झाडाचा बुंधा, खोड, हिरवीगार पानं पाहिली की आपल्याला छान वाटतं, मन प्रसन्न होतं. धरणीमाता हिरवीगार पाहण्यासाठी झाडं लावणं, झाडं जगवणं हा आपल्या जगण्याचा भाग व्हायलाच पाहिजे वृक्षवल्ली आम्हा सोयरे. मग ह्या सोयऱ्यांची काळजी घेणं सर्वस्वी आपल्याच हातात आहे. प्राणवायू दात्याला स्वजीवासम जपुया.

(लेख क्र.५३५)

- **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### नवजात बालकाची परिचर्या

प्रत्येक वेळी रडण्याचे कारण भूक आहे असे नसते. इतरही कारणांमुळे म्हणजेच आईच्या सहवासासाठी, आजारी असल्यास बाळ रडू शकते; त्यामुळे मातेने बाळाला भूक लागल्यामुळेच रडते आहे का हे बघून बाळास पाजावे. सुरुवातीला निर्माण होणारे दूध खूप असते. एवढे सगळे दूध बाळाला लागत नाही; त्यामुळे दोन्ही स्तनातून साधारणपणे ५ ते १० मिनिटे स्तनपान करावे व उरलेले दूध काढून टाकावे. स्तनात दूध जास्त प्रमाणात साचल्यामुळे गाठी निर्माण होण्याची शक्यता असते. जसेजसे बाळ मोठे होते तशी दूधाची आवश्यकता वाढते. अशा वेळेस बाळाचे पोट भरल्यावर ते स्वत:हून स्तन सोडते.


**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# इस्टीमेट : बांधकाम खर्चाचा अंदाज लावण्यासाठी योग्य मार्ग

एक कन्सल्टिंग सिव्हील इंजीनिअर या नात्याने, मी अनेकदा अशा व्यक्ती आणि कुटुंबांना भेटतो जे त्यांच्या स्वप्नातील बंगला किंवा इमारत बांधण्यासाठी उत्सुक असतात. त्यांच्याकडून मला विचारलेली सर्वात सामान्य चौकशी म्हणजे वैयक्तिक बंगला किंवा इमारतीच्या बांधकाम खर्चाच्या अंदाजाबाबत (इस्टीमेट). तुम्ही प्रथमच गृहखरेदी करणारे असाल किंवा सुरवातीपासून बांधकाम करू पाहणारे असाल तरबांधकाम खर्चाचाअंदाजकसा लावला जातो हे समजून घेणे, हे महत्वाचे निर्णय घेण्यासाठी आवश्यक आहे.

बंगला किंवा रहिवासीइमारत बांधण्याच्या खर्चाचा अंदाज लावण्याची प्रक्रिया कठीण वाटू शकते, त्यात समाविष्ट असलेल्या खर्चाबद्दल खात्री नसते. बांधकाम प्रकल्पाच्या किंमतीचा अंदाज लावणे हे एक कठीण काम असू शकते, परंतु थोड्या मार्गदर्शनाने, आपण माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकता आणि आपले बजेट, अतिरिक्त खर्च, अनपेक्षित खर्चटाळू शकता. सदरील लेखातमी तुम्हाला वैयक्तिक बंगला किंवा इमारतीच्या बांधकाम खर्चाचा अंदाज लावण्याच्या मुख्य स्टेप्सबद्दलमाहिती देत आहे.













**१. साइट विश्लेषण आणि तयारी**

कोणतेही बांधकाम सुरू होण्यापूर्वी, साइटचे योग्य विश्लेषण करणे महत्त्वाचे असते. यामध्ये मातीची स्थिती, समतलता, मटेरीअल ने-आण करण्याची सुलभता आणि लोकेशन संबंधित कोणत्याही संभाव्य अडचणींचे मूल्यांकन करणे समाविष्ट आहे. जर जमीन खडकाळ, दलदलीची असेल किंवा महत्त्वपूर्ण उत्खनन आवश्यक असेल तर, साइट तयार करण्यासाठी खर्च जास्त असेल. हे घटक सामान्यत: साइटच्या तयारीच्या टप्प्यात संबोधित केले जातात आणि एकूण अंदाजामध्ये (इस्टीमेट) घटक असणे आवश्यक आहे.

**२. डिझाईन आणि आर्किटेक्चर**

बंगला किंवा इमारतीच्या डिझाइनचा एकूण बांधकाम खर्चावर लक्षणीय परिणाम होतो. क्लिष्ट डिझाईन्ससह एक जटिल, बहुमजली घर नैसर्गिकरित्या साध्या, एकल-मजली घरापेक्षा जास्त खर्च करेल. आर्किटेक्चरल आणि स्ट्रक्चरल प्लान्स अनुभवी वास्तुविशारद (आर्किटेक्ट) किंवा अभियंत्याने (इंजीनिअरने) तयार केले पाहिजेत आणि त्यांची फी तुमच्या अंदाजात समाविष्ट केली पाहिजे. डिझाइन जितके अधिक जटील (गॉडी) असेल तितका डिझाइनशी संबंधित खर्च जास्त असेल.

**३. साहित्य/मटेरीअल**

बांधकाम खर्चाच्या अंदाजामध्ये मटेरीअलची निवड ही सर्वात महत्वाची बाब आहे. तुम्ही निवडलेल्या मटेरीअलचा दर्जा आणि प्रकार (जसे की स्टँडर्ड, प्रीमियम किंवा अलिशान) एकंदर खर्चावर थेट परिणाम करतात. भिंती, मजले आणि छतासाठी सामान्य मटेरीअलमध्ये वीट, सिमेंट, खडी, वाळू, स्टील इत्यादी यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, सिरेमिक टाइल्ससारख्या स्टँडर्ड फ्लोअरिंग पर्यायांच्या तुलनेत मार्बल/ ग्रॅनाइट फ्लोअरिंग किंवा आयात केलेल्या टाइल्सची निवड केल्याने खर्चात लक्षणीय वाढ होईल.

**४. मजुरी खर्च**

बांधकाम खर्चाचा मोठा हिस्सा मजुरी साठी लागतो. (अंदाजे ३०-३५ %) बांधकामाचे लोकेशन, कुशल कामगारांची उपलब्धता आणि प्रकल्पाची जटिलता यावर मजुरीचा खर्च बदलतो. गवंडी, सुतार, इलेक्ट्रिशियन आणि प्लंबर इत्यादीसह पात्र व्यावसायिकांना सुरवातीपासून (प्लांनिंग स्टेजलाच) नियुक्त करणे महत्त्वाचे आहे, कारण त्यांचे कौशल्य कामाची किंमत आणि गुणवत्ता या दोन्हीवर लक्षणीय परिणाम करू शकते.

**५. परवानग्या आणि मंजूरी**

बांधकाम सुरू करण्यापूर्वी, तुम्हाला स्थानिक प्राधिकरणांकडून विविध परवानग्या आणि मंजूरी घेणे आवश्यक आहे. यामध्ये बांधकाम परवानग्या, पर्यावरण मंजुरी (लागू असल्यास), आणि इलेक्ट्रिकल, प्लंबिंग आणि स्ट्रक्चरल कामासाठी परवानग्या समाविष्ट आहेत. तुमच्या अंदाजानुसार परमिशनची किंमत अगदी लहान वस्तूसारखी वाटू शकते, परंतु त्यांना सुरक्षित करण्यात विलंब किंवा गुंतागुंत यामुळे तुमचा एकूण खर्च वाढू शकतो.

**६. उपयुक्तता आणि पायाभूत सुविधा**

पाणी, वीज, गॅस आणि सांडपाणी व्यवस्थापन यासारख्या उपयुक्तता स्थापित करणे हे तुमचे घर बांधण्यासाठी आवश्यक बाब आहे. या सेवांना जोडण्यासाठी लागणारा खर्च तुमच्या स्थानावरील या युटिलिटीजच्या उपलब्धतेवर अवलंबून असेल. जर तुम्ही एखाद्या दुर्गम भागात असाल जेथे सेवा सहज उपलब्ध नसतील, तर या प्रणालींचा विस्तार करण्याची किंमत तुमच्या एकूण बांधकाम खर्चात महत्त्वपूर्ण घटक असू शकते.

**७. आकस्मिकता निधी**

प्रत्येक बांधकाम प्रकल्पात, अनपेक्षित आव्हाने उद्भवू शकतात, मग ती मटेरीअलची अचानक वाढलेली किंमत असो किंवा बांधकामादरम्यान अनपेक्षित गुंतागुंत असो. अशा अनिश्चिततेसाठी, एकूण अंदाजित खर्चाच्या सुमारे ५-१० % आकस्मिक निधी समाविष्ट करणे उचित आहे. हे सुनिश्चित करते की संपूर्ण प्रकल्पालाअडथळा न आणता तुम्ही अनपेक्षित खर्चासाठी तयार आहात.

**८. एकूण बांधकाम खर्च**

एकूण बांधकाम खर्चाची गणना करण्यासाठी, हे वरील सर्व घटकांचे संयोजन आवश्यक आहे. सामान्यतः, बांधकाम खर्च प्रति चौरस फूट किंवा बिल्ट-अप क्षेत्राच्या चौरस मीटर असे मोजले जातात. उदाहरणार्थ, एका बंगल्याची किंमत रु. १,६५० ते रु. ३,००० प्रति चौरस फूटच्या दरम्यान असू शकते, स्थान, मटेरीअल निवडी आणि डिझाइनची जटिलता यावर अवलंबून असते. त्यामुळे, २,००० चौरस फुटांच्या बंगल्यासाठी, अंदाजे किंमत रु. ३३ लाख ते रु. ६०लाख किंवा यापेक्षा अधिक असू शकते.

**अचूक इस्टीमेटसाठी आवश्यक बाबी**

**अचूक अंदाज सुनिश्चित करण्यासाठी, खालील टिपा लक्षात ठेवा:**

✻ तपशीलवार रहा : कंत्राटदार आणि पुरवठादारांना तपशीलवार तपशील आणि रेखाचित्रे प्रदान करा.

✻ स्थानिक खर्चाचे संशोधन करा : अचूकता सुनिश्चित करण्यासाठी स्थानिक साहित्य आणि श्रम खर्चावरील माहिती गोळा करा.

✻ तुमचा अंदाज पॅड करा : अनपेक्षित खर्च भरण्यासाठी आकस्मिक निधी जोडा.

✻ नियमितपणे पुनरावलोकन करा: खर्च आणि कामामधील केलेला बदल (स्पेसिफिकेशन व डिझाइन इ.) याचा खर्च गृहीतधरण्यासाठी आपल्या अंदाजाचे नियमितपणे पुनरावलोकन करा आणि अद्ययावत करा.

✻ व्यावसायिक अंदाजकार (प्रोफेशनल इस्तीमेटर) नेमण्याचा विचार करा: जर तुम्हाला खर्चाचा अंदाज लावण्याचा अनुभव नसेल, तर व्यावसायिक अंदाजकार नेमण्याचा विचार करा. त्यांची फी तात्पुरत्या व सुरवातीलाच जास्त वाटू शकते, परंतु ती पूर्ण कामाच्या अंदाजपत्रकावर प्रभावी ठरते.

**सामान्य टाळता येण्यासारख्या चुका**

बांधकाम प्रकल्पाच्या खर्चाचा अंदाज लावताना, सामान्य चुका टाळणे आवश्यक आहे ज्यामुळे खर्च वाढू शकतो. यामध्ये खालील गोष्टी समाविष्ट आहेत :

✻ ऐकीव, खोटी व आभासी माहितीवर विसंबून राहणे.

✻ खर्च कमी लेखणे: छुपे खर्च -सर्व खर्चाचा हिशोब गृहीत धरणे.

✻ बचतीचा अतिरेक करणे: खर्च प्रत्यक्षात आहे त्यापेक्षा कमी असेल असे गृहीत धरून.

✻ आकस्मिक परिस्थितींसाठी नियोजन करण्यात अयशस्वी होणेन : अनपेक्षित खर्च भरण्यासाठी आकस्मिक निधीचा समावेश न करणे.

✻ वाढणाऱ्या महागाईचा विचार न करणे: महागाईचा विचार न केल्याने खर्चात वाढ होऊ शकते.

✻ प्लांनिंगमध्ये सातत्याने बदल करणे : उदा. आवडीनुसार डिझाइन व मटेरियल स्पेसिफिकेशन मध्ये आयत्यावेळी बदल करणे.

✻ प्लांनिंग व परस्पर समन्वयाअभावी तोडफोड होऊन खर्च वाढणे.

✻ तांत्रिक सल्लागाराची नेमणूक न करणे.

**निष्कर्ष**

वैयक्तिक बंगला किंवा इमारतीच्या खर्चाचा अंदाज लावण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन आणि विविध घटकांचा विचार करणे आवश्यक आहे. अनुभवी व्यावसायिकांसोबत काम करणे आवश्यक आहे जे तुमच्या प्रकल्पाच्या वैशिष्ट्यांवर आधारित अचूक अंदाज देऊ शकतात. आकस्मिक परिस्थितींसाठी भत्त्यांसह योग्य बजेटिंग, तुमचा प्रकल्प मार्गावर आणि तुमच्या आर्थिक बजेटमध्ये राहील याची खात्री करण्यात मदत करेल.

बांधकाम अंदाजाच्या या महत्त्वाच्या बाबी समजून घेऊन, तुम्ही तुमच्या घर बांधण्याच्या प्रकल्पाबाबत अधिक चांगल्या प्रकारे माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकता, तुमच्या स्वप्नातील घर बजेटमध्ये आणि कोणत्याही आश्चर्याशिवाय बांधले जाईल याची खात्री करून घेऊ शकता.

**- इंजि. वैभव संजय बाहेकर,**
**पालसीस एंटरप्राइजेस**
**प्रोजेक्ट प्लांनिंग कन्सल्टंट**
**पत्ता - चौथा मजला, स्काय हब, ऐक्यनगर, पाईपलाइन रोड, सावेडी, अहिल्यानगर- ४१४००३.**
**ईमेल - palsisent@gmail.com**
**मो. ८९९९०२६८५८, ७७४३८६०८०६.**



आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
Reg. No. Mah/1393/1987 F 1350/1988/ANR
AESA Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# १०० व्या अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनात बाल महोत्सवाची सुरुवात

## बालमहोत्सवाने प्रेक्षक मंत्रमुग्ध, नाट्य सादरीकरणातील बाल कलाकारांचा उत्साह वाखाणण्याजोगा

नगर - नृत्य, नाट्य, गायन, वादन या रंगमंचीय कलांसोबत लहान मुलांसाठी कार्यरत असणाऱ्या रंगमंचीय कलेचे, खेळांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे उद्दिष्ट घेऊन वाटचाल करीत बालकलावंतांना मोठे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने अहिल्यानगर येथील १०० व्या विभागीय मराठी नाट्य संमेलनात बाल महोत्सवाचे आयोजन केले असल्याचे प्रतिपादन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा आणि सिने नाट्य अभिनेत्री नीलम शिर्के - सावंत यांनी अहिल्यानगर येथील १०० व्या अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनातील बाल महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी केले.



१०० व्या अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनात बाल महोत्सवाची दीपप्रज्वलनाने सुरुवात करताना डॉ. बापूसाहेब कांडेकर, क्षितिज झावरे, सतीश लोटके, अनंत जोशी, डॉ. सुधा कांकरिया, चैत्राली जावळे आदी.

१०० व्या अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनात आज तिसऱ्या दिवशी माउली सभागृहातील शाहू मोडक नगरीतील मोहन सैद रंगमंचावर नटराज पूजनाने बाल महोत्सवाला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सावंत यांच्या हस्ते या बाल महोत्सवाचे उद्घाटन झाले. स्वागताध्यक्ष डॉ. बापूसाहेब कांडेकर यांच्या हस्ते नीलम शिर्के-सावंत यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर स्वागताध्यक्ष डॉ. बापूसाहेब कांडेकर, संमेलन प्रमुख क्षितिज झावरे, मध्यवर्तीचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, अनंत जोशी, डॉ. सुधा कांकरिया, उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर, प्रमुख कार्यवाह चैत्राली जावळे, कोषाध्यक्ष जालिंदर शिंदे, बालरंगभूमी परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रसाद भणगे, डॉ. विजय जोशी आदी उपस्थित होते. या उद्घाटन प्रसंगी सादर होणाऱ्या एकांकिकांच्या संघांचा नीलम शिर्के यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या महोत्सवामध्ये जिना इसिका नाम है, हीच खरी सुरुवात, डस्टर, आणि कृष्णलीला या एकांकिका सादर करण्यात आल्या. बाल रंगभूमीला नव्या उंचीवर नेणाऱ्या या महोत्सवाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. नाट्य सादरीकरणातील बाल कलाकारांचा उत्साह आणि कलाकृतींची उंची प्रेक्षकांनी भरभरून कौतुकाने स्वीकारली. या संमेलनानिमित्त आयोजित रांगोळी प्रदर्शनास ही नीलम शिर्के यांनी भेट देत उपक्रमाचे कौतुक केले. उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक प्रसाद बेडेकर, सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी तर चैत्राली जावळे यांनी आभार मानले.

# अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनाचे रविवारी उद्घाटन

## सावेडी उपनगरात निघणार नाट्य दिंडी

नगर : नगरमध्ये २६ व २७ जानेवारी रोजी आयोजित अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. संमेलनाचा मुख्य उद्घाटन सोहळा पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्रांगणात शाहू मोडक नगरीत सायंकाळी ६ वाजता रंगणार आहे. या संमेलनानिमित्त नगरच्या कलाकारांनी नांदी आणि स्वागतगीताची निर्मिती केली आहे. संमेलनस्थळी १०० कलाकार नांदी सादर करणार आहेत. २६ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता नाट्य दिंडीही काढण्यात येणार आहे. प्रोफेसर कॉलनी चौक, प्रेमदान चौक, माऊली सभागृह ते पेमराज सारडा महाविद्यालय प्रांगण संमेलनस्थळी ही नाट्य दिंडी दाखल होईल.




नांदी म्हणजे ईश्वराचे स्तवन, मंगलाचरण असणारी एक प्रकारची लोककला आहे. नाटकाचा प्रयोग सुखरूप पार पडावा म्हणून नाट्यारंभी नांदी म्हटली जाते. १०० व्या विभागीय मराठी नाट्य संमेलनासाठी नगरच्या मंगल पाठक लिखित आणि ऋतुजा पाठक यांनी संगीतबद्ध केलेली विशेष नांदी २६ जानेवारी रोजी पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्रांगणात सायंकाळी ६ वाजता संमेलन उद्घाटनप्रसंगी निनादणार आहे. संमेलनप्रमुख क्षितिज झावरे यांची संकल्पना असलेले सुप्रिया ओगले दिग्दर्शित स्वागतासाठी १०० नृत्यांगनांचा नृत्याविष्कार यावेळी पहायला मिळेल.

संमेलनाचे उद्घाटन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या मध्यवर्तीचे विश्वस्त व राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, नाट्य परिषदेच्या मध्यवर्तीचे विश्वस्त व ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, ज्येष्ठ अभिनेते मकरंद अनासपुरे, ९९ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक आर्दीची उपस्थिती राहील.

उदघाटनानंतर सायंकाळी ७ वाजता अभिनेत्री मानसी नाईक, माधवी निमकर, विशाखा सुभेदार, सुरेखा कुडची, गायिका सन्मिता धापटे - शिंदे, गायक राहुल सक्सेना व चंद्रशेखर महामुनी, अभिनेते कमलाकर सातपुते, झी सारेगम फेम संदीप उबाळे, मयूर पालंडे, कविता जावळेकर हे कलाकार संगीत रजनी सादर करणार आहेत. नगरच्या या ऐतिहासिक नाट्य संमेलनात रसिकांनी सहभागी होण्याचे आवाहन स्वागताध्यक्ष डॉ.बापूसाहेब कांडेकर, निमंत्रक आमदार संग्राम जगताप, संमेलन प्रमुख क्षितिज झावरे, उपनगर शाखेचे अध्यक्ष -प्रसाद बेडेकर, प्रमुख कार्यवाहक चैत्राली जावळे, मध्यवर्ती कोषाध्यक्ष सतीश लोटके, मध्यवर्ती नियामक मंडळ सदस्य संजय दळवी, अहिल्यानगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, कोषाध्यक्ष जालिंदर शिंदे, मार्गदर्शक पी. डी. कुलकर्णी, प्रसिद्धीप्रमुख अविनाश कराळे आदींनी केले आहे.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या ४ आखाड्यासाठी रेसलिंग प्लॅटफॉर्मचे काम प्रगतीपथावर

नगर - येत्या २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान अहिल्यानगर मध्ये होणाऱ्या महाराष्ट्र केसरी किताब स्पर्धा व ६७ वी वरिष्ठ माती व गादी राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धांच्या आखाड्यांच्या व व्यासपीठाच्या कामास सुरवात झाली आहे. कुस्तीगीर संघाच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने जिल्हाध्यक्ष आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेची तयारी करण्यात येत आहे. जिल्हा कुस्तीगीर संघाचे पदाधिकारी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी बारकाईने सर्व नियोजन करत आहे. या स्पर्धे साठी वाडियापार्क मैदानावर उभारण्यात आलेल्या स्व. बलभीमअण्णा जगताप क्रीडा नगरीचे मैदान सजवले जात असून प्रेक्षक गॅलरीची रंगरंगोटी करण्यात आली आहे. तसेच भव्य व्यासपीठ, कुस्तीसाठी माती व गादीच्या आखाड्यांचे काम प्रगतीपथावर आहे. यासाठी जिल्हा कुस्तीगीर संघाचे पदाधिकारी मैदानावर तळ ठोकून आहेत.



अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या महाराष्ट्र केसरी किताब स्पर्धेच्या चार आखाड्यांसाठी भव्य रेसलिंग प्लॅटफॉर्म व व्यासपीठाच्या कामास सुरवात झाली आहे. जिल्हा कुस्तीगीर संघाच्या पदाधिकाऱ्यांनी कामाची पाहणी केली. यावेळी सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ, खजिनदार शिवाजी चव्हाण. पै. युवराज करंजुले, निलेश मदने, अनिल गुंजाळ, मोहन गुंजाळ, दादासाहेब पांडुळे आदींसह पदाधिकारी.

मैदानाची माहिती देताना जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ म्हणाले, महाराष्ट्र केसरी किताब स्पर्धेची जय्यत तयारी सुरु झाली आहे. ही स्पर्धा ऐतिहासिक व राज्यातील सर्वात मोठी स्पर्धा ठरावी यासाठी नियोजन करत आहेत. या स्पर्धेसाठी राज्यातून ४६ संघांच्या ९२० खेळाडूंचा सहभाग होणार आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील गादी व माती या दोन्ही गटांच्या आखाड्यासाठी ५० बाय २०० फुटाचा रेसलिंग प्लॅटफॉर्म उभारण्यात आला असून त्यावर मातीचे दोन व गादींचे दोन आखाड्यांच्या कामास सुरवात झाली आहे. तसेच १०० बाय ४० फुटाचा स्टेज उभारण्यात येत असून त्यावर उपस्थित पाहुण्यांसाठी व्हीव्हीआयपी व व्हीआयपी असे दोन स्टेज करण्यात येत आहेत. तसेच गॅलरीत सुमारे २५ ते ३० हजार प्रेक्षकांसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. प्रेक्षकांना कुस्ती जवळून व व्यवस्थित पहाता यावी यासाठी ठिकठिकाणी एलईडी स्क्रीन लावण्यात येणार आहेत.

कुस्तीगीर संघाचे खजिनदार शिवाजी चव्हाण म्हणाले, महाराष्ट्र केसरी व राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धांसाठी मातीचे दोन आखाडे तयार करण्यात आले असून त्यासाठी उत्तम दर्जाची माती आणण्यात आली आहे. त्या मातीत गेरू, हळद व तेल असा खुराक मिसळण्यात येत आहे.

उत्तर महाराष्ट्र केसरी पै. युवराज करंजुले म्हणाले, गादी विभागातील कुस्त्यांसाठी ४० बाय ४० फुटांचे दोन आखाडे तयार करण्यात आले असून त्यावर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मॅट टाकण्यात येणार आहेत.

यावेळी अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे कार्यालयीन सचिव निलेश मदने, पै. अनिल गुंजाळ, पै. मोहन गुंजाळ, पै. दादासाहेब पांडुळे, पै. अतुल कावळे, पै. मनोज फुले, पै. निखिल कांडेकर, पै. राकेश मिसाळ, पै. निलेश रणसिंग, पै. विकी वाघ व पै. गणेश भदर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# विभागीय मराठी नाट्य संमेलनात नगरचे कलाकार सादर करणार विशेष स्वागतगीत

नगर - नगरमध्ये २६ व २७ जानेवारी रोजी आयोजित अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या संमेलनानिमित्त नगरच्या कलाकारांनी विशेष स्वागतगीताची निर्मिती केली आहे.

पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्रांगणात संमेलनस्थळी २७ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता १०० कलाकार स्वागतगीत सादर करणार आहेत. नाट्य संमेलनानिमित्त 'गणपति रे...अधिपति रे..' या स्वागतगीताची रचना संजोग धोत्रे यांनी केली असून पवन श्रीकांत नाईक यांनी हे स्वागतगीत संगीतबद्ध केले आहे. अभिजीत अपस्तंभ, आदेश चव्हाण, अनिरुद्ध धर्माधिकारी, भार्गव देशपांडे, मूलांशु परदेशी, पवन श्रीकांत नाईक, अनुजा कुलकर्णी, ऋतुजा पाठक, अमृता बेडेकर, वर्षा पंडीत, संपदा चौधरी, अपर्णा बालटे व श्रेया सुवर्णपाठकी हे गायक - गायिका या स्वागतगीताचे गायन करणार आहेत. पवन श्रीकांत नाईक, ऋतुजा पाठक व अमृता बेडेकर हे संवादिनी वाद्याची संगत करणार असून प्रणव देशपांडे व कुलदीप चव्हाण हे सिंथेसायझर व बेंजो वाद्याची संगत करणार आहेत. तबला वाद्य संगत शेखर दरवडे व प्रसाद सुवर्णपाठकी यांचे असून सहवाद्य संगत श्रेयस शित्रे व राधिका परदेशी यांचे असणार आहे. ज्ञानदेव आढाव, नवरतन वर्मा, पवन तळेकर, सुशील परदेशी, वर्षा आढाव व त्रिमूर्ती कलशेट्टी हे मंचीय मदतनीस व्यवस्था पाहणार आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



तारकपूर बस स्थानकातील खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या प्रश्नासंदर्भात चर्चा करताना खा.निलेश लंके.

# तारकपूर बस स्थानकातील खाद्यपदार्थ विक्रेत्यांचा प्रश्न मार्गी

## खासदार निलेश लंके यांनी केली आगार प्रमुखांसह अधिकाऱ्यांशी चर्चा

नगर – एसटी महामंडळ प्रशासनाच्या वतीने बंदी घातलेल्या तारकपूर बस स्थानक येथील खाद्य पदार्थ विक्रेत्यांच्या प्रश्नावर खा. निलेश लंके यांनी एसटी च्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून तोडगा काढला असून त्यामुळे खाद्य पदार्थ विक्रेत्यांचा उपजीविकेचा प्रश्न मार्गी लागला आहे.

तारकपूर बस स्थानकावर अनेक वर्षापासून काही खाद्य पदार्थ विक्रेते हातावर व्यवसाय करत होते. मात्र तारकपूर बसस्थानक प्रशासनाच्या वतीने त्यांच्यावर अचानकपणे बंदी घातल्यामुळे ४० कुटुंबांचा उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला होताफया प्रश्नासंदर्भात खासदार निलेश लंके यांनी तारकपूर बस स्थानक येथे भेट देत खाद्य विक्रेते व प्रशासन यांची बैठक घेत चर्चा घडून आणली.

सकारात्मक चर्चेनंतर प्रत्येक खाद्यविक्रेत्याला लायसन देण्याच्या सूचना केल्या, त्यानुसार आता खाद्य विक्रेत्यांना लायसन मिळणार असून आता खाद्य विक्रेते बसस्थानकावर हातावर फिरवून पुन्हा व्यवसाय करतील. खाद्यविक्रेत्यांच्या प्रश्नासंदर्भात खासदार निलेश लंके यांनी तोडगा काढल्यामुळे खाद्य विक्रेते यांनी खासदार निलेश लंके यांचे आभार मानले. यावेळी आगार प्रमुख अभिजित चौधरी, तारकपूर बस स्थानक प्रमुख अविनाश कलापुरे, माजी नगरसेवक भैय्या परदेशी, गणेश साठे, संदीप शिंदे यांच्यासह खाद्यविक्रेते आदी उपस्थित होते.

# सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेच्या शिष्टमंडळाला दिल्लीत घेऊन जाणार : खा. निलेश लंके

### सेवानिवृत्तांची उपदान अंशराशीकरण रक्कम मिळवण्यासाठी आंदोलनाची घोषणा; केंद्राप्रमाणे सेवानिवृत्तांना दरमहा १ हजार वैद्यकीय मदत देण्याची मागणी





अहिल्यानगर पेन्शनर्स असोसिएशनच्या त्रैवार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटनाप्रसंगी खासदार निलेश लंके.

नगर – शिक्षकाचा मुलगा असल्याचा अभिमान असून, शिक्षकांच्या शिस्तीत व संस्कारात घडलो आहे. सेवानिवृत्त शिक्षकांना न्याय देऊ शकलो नाही, तर त्या राजकीय पदावर राहण्याचा मला अधिकार नाही. सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न केंद्र स्तरावर सोडविण्यासाठी संघटनेच्या शिष्टमंडळाला दिल्लीत घेऊन जावून केंद्रीय अर्थमंत्री यांच्यासह चर्चा घडवून आणण्याचे आश्वासन खासदार निलेश लंके यांनी दिले.

सेवानिवृत्त शिक्षकांची संघटना असलेल्या अहिल्यानगर पेन्शनर्स असोसिएशनच्या त्रैवार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटनाप्रसंगी खासदार लंके बोलत होते. टिळक रोड, लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष एन. डी. मारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनाप्रसंगी जि.प. प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे, राज्य सचिव नामदेवराव घुगे, नगर जिल्हाध्यक्ष द. मा. ठुबे, सरचिटणीस बन्सी उबाळे, अशोक ढसाळ, वि. नी. कोल्हे, अधोक धासळ, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे वसंतराव सबनीस, अनंतराव पाटील, म. रा. सोनवणे, वारे, मधुकर साबळे, डी. आर. पाटील आदींसह पदाधिकारी, सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित होते.

पुढे खासदार लंके म्हणाले की, समाज घडविणारे शिक्षक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे प्रश्न सोडविणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. संघटनेचे शिष्टमंडळ, खासदार शरद पवार व सुप्रियाताई सुळे यांच्या नेतृत्वाखाली सेवानिवृत्तांच्या प्रश्नावर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांची भेट घेण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एन. डी. मारणे म्हणाले की, सेवानिवृत्त शिक्षकांचे जीवन सुकर होण्यासाठी संघटनेचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. प्रश्न सुटत नसल्याने ते गंभीर बनत चालले आहे. सेवानिवृत्त शिक्षकांच्या प्रश्नासाठी उच्च न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत दाद मागून त्यांना न्याय मिळवून देण्यात आला आहे. इतर प्रलंबित मागण्यांसाठी देखील हा संघर्ष सुरु राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बन्सी उबाळे यांनी अधिवेशनात प्रास्ताविक करुन अहवाल वाचन केले. द.मा. ठुबे यांनी सेवानिवृत्त शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करुन मागील कार्याचा आढावा घेतला. तर भविष्यातील वाटचाल स्पष्ट केली. या अधिवेशनात मे २०२४ ला व त्यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या सेवानिवृत्तांची उपदान अंशराशीकरण रक्कम मिळवण्यासाठी आंदोलनाची घोषणा करण्यात आली.

अंशराशीकरण मुदत १५ वर्ष ऐवजी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे ११ वर्षे ६ महिने व्हावी, १ जुलै २०२४ च्या केंद्राच्या निर्णयाप्रमाणे ३ टक्के वाढ मिळावी, निवडश्रेणी प्रस्ताव मंजुरीसाठी प्रयत्न करुन, वेतन निश्चिती करणे, ६५ वय झालेल्यांना ५ टक्के पेन्शन वाढ होण्याबाबत व केंद्र शासनाप्रमाणे सेवानिवृत्तांना किमान १ हजार रुपये दरमहा वैद्यकीय मदत मिळण्याबाबत संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करण्याचे स्पष्ट करण्यात आले. या अधिवेशनात जिल्ह्यातील दोन ते अडीच हजार शिक्षक पेन्शनर्स सहभागी झाले होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सूर्यभान काळे, किशोर हारदे, रामकृष्ण बोरुडे, सुनील घोलप, बबन कुलट, भाऊसाहेब काळे, सुनील सोनवणे, अविनाश गांगर्डे, नवनाथ बोरुडे, भीमसेन चत्तर, बेबीताई तोडमल, सविता साळुंखे, शामला साठे यांनी परिश्रम घेतले. आभार भाऊसाहेब डेरे यांनी मानले.


## ग्रामपंचायत धामोरी, ता.कोपरगाव

## जाहीर निविदा

ग्रामपंचायत धामोरी, ता.कोपरगाव, जि. अहिल्यानगर येथील खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी –१ निविदा दरपत्रके मागविणेत येत आहे.

| अ. नं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | योजनेचे नाव | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे धामोरी येथील नवनाथ नगर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ४,८३,९२८/– | अनु. जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे सन २०२४–२५ | सु.बे. |
| २ | मौजे धामोरी येथील नंदीनगर बंदिस्त पाईप गटार करणे | ४,१५,५६५/– | अनु. जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे सन २०२४–२५ | खुला |

अटी व शर्ती :– १) निविदा फॉर्म माहिती पत्रक दि. २५/०१/२०२५ ते ३१/०१/२०२५ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी–१ निविदा दि.१/२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. ३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे. निविदेसोबत – १) जि. प.नोंदणी २) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४) अनुभवाचा दाखला काम पुर्ण करण्याचा कालावधी–६ महिने

ग्रामसेवक/सरपंच

धामोरी, ता.कोपरगाव जि. अहिल्यानगर


# राष्ट्रीय कराटे क्षेत्रातील सबील सय्यद यांना सन्मान कर्तृत्वाच्या पुरस्काराने सन्मानित



राष्ट्रीय कराटे क्षेत्रातील सबील सय्यद यांना सन्मान कर्तुत्वाच्या पुरस्काराने सन्मानित करताना माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे आदी.

नगर – दक्ष पोलीस मित्र सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने नगर कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह येथे राष्ट्रीय कराटे क्षेत्रातील खेळाडू सबील सय्यद यांनी क्रीडा क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल सन्मान कर्तुत्वाचा या पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आमदार शिवाजीराव कर्डिले, प्रमुख पाहुणे आमदार संग्राम जगताप, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, प्रांत सुधीर पाटील, डी वाय एस पी अमोल भारती, मनोज कुमार सत्रे, तहसीलदार संजय शिंदे, अभिनव मिठाले, दक्ष पोलीस मित्र सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शहादेव मुंगसे आदी उपस्थित होते.

सबील सय्यद यांनी कराटे क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यांनी राष्ट्रीय कराटे स्पर्धा व उपमुख्यमंत्री चषक कराटे स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना कराटेचे प्रशिक्षण मिळाले आहे. यातून अनेक विद्यार्थ्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. कराटेच्या माध्यमातून युवकांमध्ये आत्मविश्वास व शारीरिक क्षमतेचा विकास करण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे. सबील सय्यद यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील कराटे क्षेत्राला नवी उंची मिळाली आहे.

# नैतिक ट्रेडर्स मोबाईल, लॅपटॉप, इलेक्ट्रॉनिक 'होम अप्लायंसेस' चे २६ जानेवारीला उद्घाटन




नगर – नगर–पुणे रोडवरील केडगाव रंगोली हॉटेल जवळ नैतिक ट्रेडर्स या नवीन मोबाईल, लॅपटॉप, इलेक्ट्रॉनिक होम अप्लायंसेस दालनाचा शुभारंभ प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी रोजी होणार आहे. जगातील नामांकित ब्रॅण्डचे मोबाईल, इलेक्ट्रॉनिक होम अप्लायंसेस या दालनात उपलब्ध करून देण्यात आले आहेत, अशी माहिती संचालक पंकज बाजीया, अमित बाजिया, प्रदीप कुसळकर यांनी दिली.

आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, लॅपटॉप, इलेक्ट्रॉनिक होम अप्लायंसेस प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. ग्राहक अतिशय चोखंदळपणे या वस्तुंची खरेदी करतो. हेच लक्षात घेऊन नैतिक ट्रेडर्स हे दालन खुले होत आहे. गोदरेज, मित्सुबिशी, हायर, सॅमसंग, व्हिओ, नोकिया, एचपी, एलजी, सोनी अशा अनेक नामांकित ब्रॅण्डचे उत्पादने दालनात उपलब्ध आहेत.

कंपनीच्या विविध ऑफर्स तसेच योजनांचा लाभ तसेच विक्री पश्चात तत्पर सेवा दालनात मिळणार आहे. प्रत्यक्ष खरेदी करून विश्वसनीय सेवा नूतन दालनात मिळणार आहे. केडगाव उपनगर यासह नगर शहरातील ग्राहकांनी दालनास भेट घेतली द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.















# अभिषेक चावला बीटेक परिक्षा उत्तीर्ण



नगर – येथील अभिषेक अनूप चावला यांनी बीटेक परीक्षा उत्तीर्ण केली. कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनियरिंग CSE करुणाया यूनिवर्सिटी कोयंबतूर तामिळनाडू या विद्यापीठाचा निकाल लागला. त्यात चांगल्या मार्कांनी अभिषेक यांनी हे यश प्राप्त केले.

डाटा मॅनेजमेंट सिस्टम, ए आई फेस रिकॉनाइजेशन, ह्युमन एक्टिविटी रिकॉनाइजेशन इन वीडियो यूजिंग डीप लर्निंग, साइबर सिक्युरिटी फ़ॉर ई व्हीकल प्रोजेक्ट आणि सी. सी. एन. ए., कॉम्प्युटर हार्डवेअर, साइबर सिक्युरिटी, माइक्रोसॉफ्ट अजूर, ए आई इंटर नेट ऑफ थिंक्स सारखे प्रोजेक्ट कोर्ससहित अनेक नॅशनल, इंटरनॅशनल वर्कशॉप्स अभिषेक यांनी केले आहे. अभिषेकने दहावीचे शिक्षण आष्टी पब्लिक स्कूल आणि बारावीचे शिक्षण नगर जूनियर कॉलेजला केले आहे.

# श्री एकदंत कॉलनीत २६ जानेवारीला रक्तदान शिबीर

नगर – श्री एकदंत गणेश मंडळाच्यावतीने गणेश जयंतीच्या औचित्याने २६ जानेवारी रोजी श्री एकदंत कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर येथे स.१० ते दु.५ पर्यंत आनंदऋषीजी ब्लड बँक यांच्या सहकार्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात अहिल्यानगरकरांनी सहभाग नोंदवावा, असे अवाहन करण्यात आले.


## चिंचेचा फळांचा जाहीर लिलाव

मौजे मांडवगण, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथील श्री सिध्देश्वर महादेव मंदिराच्या परिसरातील अंदाजे चिंचेच्या फळांचा लिलाव करण्यात येणार आहे. ज्यांना टेंडर पाठवायचे असेल त्यांनी दि.१२-०२-२०२५ पर्यंत भरून पाठवावेत. सदरच्या फळांचा लिलाव दिनांक १७/०२/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता हजर राहूनही प्रत्यक्ष भाग घेता येईल. चिंचेची योग्य किंमत बोली आली नाही तर चिंचेचा लिलाव न्यासाचे विश्वस्त रद्द करू शकतात. टेंडरवाल्यांनी ही प्रत्यक्ष हजर रहावे.

9423783189




# निरामय

## तंतूमय पदार्थ खा

आहारतंत्र

उच्च रक्तदाब ही सर्वसामान्य बाब बनून गेली आहे. प्रौढांपासून तरुणांपर्यंत अनेकांना ही व्याधी जडते. उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी औषधं घेतली जातात. पण त्याचे काही दुष्परिणामही दिसून येतात. नैसर्गिक पद्धतीनेही आपण उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवू शकतो. यासाठी आहारात तंतूमय म्हणजेच फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करायला हवा. कोणते तंतूमय पदार्थ लाभदायी ठरू शकतात याविषयी...



दैनंदिन आहारात पूर्ण धान्यांचा समावेश करा. पूर्ण धान्यांमधल्या तंतूमय पदार्थांमुळे पोट भरलेलं रहातं. यासह इतर पोषक घटकही मिळतात.

अनेक भाज्या तंतूमय पदार्थांनी समृद्ध असतात. ब्रोकोली, भोपळा, बटाटे, गाजर, पालक, रताळी, मका, फ्लॉवर आणि फसरबी या भाज्यांमध्ये तंतूमय पदार्थ मुबलक प्रमाणात असतात.

तंतूमय पदार्थ मिळवण्यासाठी सफरचंद, केळी, स्ट्रॉबेरी, आंबा, ॲव्होकॅडो, पिअर, संत्रं आणि पेरु ही फळं खाता येतील.

## पुन्हा नवा विषाणू

आरोग्य चर्चा

चीनमध्ये पाच वर्षांपूर्वी कोरोना व्हायरस नावाचा आजार पसरला होता. त्याने जगभरात हाहाकार माजवला होता. आता पुन्हा एकदा चीनमध्ये एक विषाणू पसरत आहे. चिंतेची बाब म्हणजे या विषाणूची बहुतांश लक्षणे कोरोना सारखीच आहेत. या विषाणूचे नाव 'ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस' असले तरी त्याचा संसर्ग झालेल्या लोकांमध्ये खोकला, सर्दी आणि श्वास घेण्यात अडचण अशी लक्षणे दिसून येत आहेत.

चीन 'सीडीसी'चे म्हणणे आहे, की मानवी न्यूमोनिया विषाणूची प्रकरणे सतत वाढत आहेत. या विषाणूची अधिक प्रकरणे दोन वर्षांखालील मुलांमध्ये आढळतात. ज्या लोकांना आधीच श्वसनाचे कोणतेही आजार आहेत, त्यांना जास्त धोका असल्याचे सांगितले जात आहे. हा विषाणू संसर्गजन्य असल्याने आणि एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे वेगाने पसरत असल्याने, चीनचा आरोग्य विभाग सतर्क आहे आणि व्हायरसला रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर चाचण्याही सुरू आहेत.

या व्हायरसमुळे चीनमध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याचा दावा काही मीडिया रिपोर्टस्मध्ये करण्यात आला. 'ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस' (एचएमपीव्ही) हा एक विषाणू आहे, ज्याची लक्षणे सामान्यतः सर्दीसारखी असतात. तथापि, हा विषाणू फुफ्फुसांवर परिणाम करतो आणि काहीवेळा तो न्यूमोनिया, दमा किंवा क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह



पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) सारख्या आजार असलेल्या रुग्णांसाठी धोकादायक ठरू शकतो.

सहसा या विषाणूची प्रकरणे मुलांमध्ये दिसतात. काही प्रकरणांमध्ये, हे 'आरएसव्ही' संसर्गासारखेच आहे. त्यामुळे मुलांमध्ये खोकला, सर्दी, ताप यासारख्या समस्या निर्माण होतात.

**✲ प्राणघातक ठरण्याची भीती**

जगभरातील दहा ते बारा टक्के मुलांमध्ये श्वसनाचे आजार 'एचएणपीव्ही'मुळे होतात. बहुतेक प्रकरणे सौम्य असतात आणि काही लक्षणे असतात; परंतु सुमारे पाच ते १६ टक्के मुलांना न्यूमोनिया होण्याचा धोका असतो. न्यूमोनिया हा एक धोकादायक आजार आहे. त्यावर वेळीच नियंत्रण न केल्यास प्राणघातक ठरू शकतो. अशा परिस्थितीत या विषाणूमुळे एखाद्या बालकाला न्यूमोनिया झाला तर त्याच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

**✲ आजार जुनाच**

'ह्युमन मोटापन्यूमोव्हायरस' हा नवीन आजार नाही. हा दोन दशक जुना व्हायरस आहे. हे २००१ मध्ये पहिल्यांदा ओळखले गेले. हा विषाणू सर्व प्रकारच्या हवामानात, वातावरणात असतो. जगातील काही देशांमध्ये यापूर्वीही त्याची प्रकरणे नोंदवली गेली आहेत. हा विषाणू बहुतेक पाच वर्षांपेक्षा लहान मुलांना संक्रमित करतो; परंतु बहुतेक प्रकरणांमध्ये लक्षणे सौम्य असतात. बहुतेक मुलांमध्ये सर्दी आणि खोकल्याची सामान्य लक्षणे असतात. केवळ काही प्रकरणांमध्ये या विषाणूमुळे श्वसन रोग होतो. किंवा न्यूमोनिया होतो.

**✲ गांभीर्याने घेण्याची गरज**

मानवी 'मेटापन्यूमोव्हायरस'वर उपचार करणारी कोणतीही अँटीव्हायरल औषधे नाहीत. बहुतेक लोकांवर केवळ लक्षणांच्या आधारे उपचार केले जातात. फुफ्फुसाचा संसर्ग टाळण्यासाठी डॉक्टर ऑक्सिजन थेरपी आणि औषधांनी उपचार करतात. या विषाणूवर कोणतेही प्रतिजैविक औषध नाही.

**✲ काय काळजी घ्याल?**

✲ साबण आणि पाण्याने हात धुवा. ✲ शिंक किंवा खोकल्याच्या वेळी नाक आणि तोंड झाका. ✲ सर्दी किंवा इतर संसर्गजन्य आजार असेल तेव्हा इतर लोकांच्या आसपास राहणे टाळा. ✲ मास्क घाला.

– डॉ. महेश दळे

## आरोग्यासाठी जास्त मसाले घातक

आरोग्य विशेष

हिवाळ्यात आपण भरपूर मसाले खातो. कारण या दिवसात आपल्याला शरीर उबदार ठेवण्याची गरज असते आणि मसाल्यांमुळे शरीराचे तापमान वाढत असते. दालचिनी, लवंग, काळी मिरी, वेलची आणि आले यांसारख्या मसाल्यांमध्ये औषधी गुणधर्म असतात. ते थंडीच्या काळात शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात. हे मसाले पचनसंस्था तर सुधारतातच; पण सर्दी, खोकला आणि ताप यांसारख्या समस्यांपासून बचाव करतात. दालचिनी आणि आले रक्ताभिसरण सुधारतात आणि शरीराला



आतून उबदार ठेवतात. काळी मिरी आणि लवंग घसा खवखवणे कमी करण्यास आणि बॅक्टेरियापासून संरक्षण करण्यास मदत करतात. वेलची केवळ सुगंध देत नाही तर पचनक्रिया सुधारते. हे मसाले हिवाळ्यात पदार्थांना चव आणि उबदारपणा देण्यासाठी देखील वापरले जातात. त्यांच्या नियमित सेवनाने थंडीच्या दुष्परिणामांपासून शरीराचे रक्षण होते आणि शरीर ऊर्जावान राहते; पण दुसरीकडे, हिवाळ्यात त्यांचे अतिसेवन शरीराला खूप नुकसानकारक ठरते.

हिवाळ्यात मसाल्यांचे अतिसेवन केल्यास पचनसंस्थेला हानी पोहोचते. काळी मिरी आणि लवंगासारखे मसाले तिखट असतात. त्यामुळे गॅस, अपचन आणि पोटात जळजळ होऊ शकते. विशेषत: ज्यांची पचनशक्ती कमजोर आहे, त्यांनी या मसाल्यांचे संतुलित प्रमाणात सेवन करावे. आले आणि दालचिनीसारखे मसाले शरीरात अधिक उष्णता निर्माण करतात. अति उष्णतेमुळे त्वचेवर पुरळ उठणे, खाज सुटणे किंवा घाम येणे असे प्रकार होऊ शकतात. एखाद्याच्या शरीराचे तापमान आधीच जास्त असेल, तर खूप जास्त मसाले खाल्ल्याने त्वचेशी संबंधित आजार होऊ शकतात. हिवाळ्यात मसाल्यांचे अतिसेवन गर्भवती महिलांसाठी हानिकारक ठरू शकते. हे मसाले गर्भाशयाचे आकुंचन वाढवू शकतात. त्यामुळे गरोदरपणात हलके अन्न खावे.

दालचिनी आणि काळी मिरी यांसारखे मसाले रक्ताभिसरण वाढवतात. त्यांचे अतिसेवन उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी हानिकारक ठरू शकते. हे हृदयावर दबाव आणू शकतात आणि हृदयाचे ठोके वाढवू शकतात. त्यामुळे आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. काही लोकांना मसाल्यांची ॲलर्जी असू शकते. आले, दालचिनी आणि वेलचीचे जास्त सेवन केल्याने घसा खवखवणे, त्वचेवर पुरळ येणे किंवा श्वासोच्छवासाचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे ॲलर्जीची शक्यता असल्यास हे मसाले कमी प्रमाणात सेवन करावेत.

– डॉ. सतिश सोनावणे

## गरोदरपणातले त्वचाविकार


पथ्यपाणी

गरोदरपणातले नऊ महिने हा महिलांच्या आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा काळ असतो. आई होण्याचा आनंद अनुभवत असतानाच स्त्रियांना विविध शारीरिक बदलांनाही सामोरं जावं लागतं. गरोदरपणात शारीरिक बदल होतातच शिवाय महिलांच्या त्वचेवरही परिणाम होतो. जवळपास ९० टक्के महिलांना बाळंतपणानंतर त्वचेशी संबंधित समस्यांना सामोरं जावं लागतं. नवा जीव जन्माला घालणं कोणत्याही महिलेसाठी सोपं नसतं. तिला बरीच भावनिक, मानसिक आणि शारीरिक स्थित्यंतरं अनुभवावी लागतात. या काळात काही महिलांचं वजन वाढतं. काही गुंतागुंत निर्माण होते. त्यातही गरोदरपणात आणि त्यानंतर त्वचा तसंच केसांच्या संरचनेत बरेच बदल झाल्याचं दिसून येतं.

बाळंतपणानंतर त्वचेचा पोत टिकवून ठेवणं खूप आव्हानात्मक असलं तरी हे बदल कायमस्वरुपी टिकणारे नसतात, ही त्यातल्या त्यात समाधानकारक बाब म्हणता येईल. थोडी काळजी आणि उपायांनी तुम्ही पुन्हा उजळ त्वचा प्राप्त करू शकता. गरोदरपणात उद्भवणाऱ्या त्वचेच्या काही समस्यांवर एक नजर टाकू या.

मेलास्माला मास्क ऑफ प्रेगनन्सी असंही म्हटलं जातं. एस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन या हार्मोन्सचं प्रमाण वाढल्यामुळे त्वचा काळपट दिसू लागते. गाल, कपाळ, डोळे, तोंडालगतच्या त्वचेचा काळपटपणा खूप वाढतो. हायपरपिगमेंटेशनची समस्या निर्माण होते. उन्हामुळे ही समस्या वाढू शकते. ही समस्या सोडवण्यासाठी गरोदरपणात सन्सस्क्रीनचा भरपूर वापर करावा.

हार्मोन्समधल्या बदलांमुळे त्वचेवर मुरूमं येऊ लागतात. एस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन या हार्मोन्सच्य पातळीतल्या बदलांमुळे त्वचेवर सीबमची निर्मिती अधिक प्रमाणात होते आणि त्वचेवरची रोमछिद्रे बंद




होतात. गळा आणि मानेसह चेहऱ्याच्या खालच्या भागावर याचा अधिक परिणाम जाणवतो. ही मुरुमं सौम्य ते तीव्र स्वरुपाची असू शकतात. अनेक प्रसंगी चेहऱ्यावर वेदनादायी लाल चट्टे पडू शकतात. मुरूमांचा हा त्रास काही दिवसांनंतर कमी होतो. अर्थात मुरूमांचा हा त्रास प्रत्येक महिलेला होतो असं नाही. गरोदरपणात काही महिलांची त्वचा उजळते. गरोदरपणातल्या त्वचेच्या समस्यांवर डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय उपचार करू नयेत. काही गोळ्यांमुळे गर्भाला त्रास होऊ शकतो.

गरोदरपणात पाणी कमी प्रमाणात प्यायलं जात असल्याने त्वचा कोरडी पडू लागते. डिहायड्रेशनचा त्वचेवर विपरित परिणाम होता. त्यामुळे या काळात महिलांनी भरपूर पाणी प्यावं. नारळाचं पाणीही लाभादायी ठरू शकतं. एस्ट्रोजेनच्या पातळीत वाढ झाल्यामुळे चेहऱ्याच्या रक्तवाहिन्या प्रसरण पावतात. यामुळे त्या कोळ्याच्या जाळ्यासारख्या दिसतात. बाळंतपणानंतर ही समस्या दूर होते. इतर औषधोपचारांसोबतच गरोदरपणात त्वचेची विशेष निगा राखायला हवी. यामुळे बऱ्याच समस्यांना आळा बसू शकतो. अंगावर पुरळ उठल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणं योग्य ठरतं.

## अंडी जास्त उकडू नका!

आपण कुठे चुकतो?

अंडी बरेचदा जास्त प्रमाणात उकडली जातात. आपल्याला यात वावगं असं काहीच वाटत नाही. आपण अगदी आरामात ती खातो. मात्र गरजेपेक्षा अधिक प्रमाणात उकडलेली अंडी आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतात. अंडी उकडताना त्यांच्या पांढऱ्या भागातून हायड्रोजन सल्फाइड नावाचा विषारी वायू बाहेर पडतो. अंडी अधिक प्रमाणात उकडल्याने ही समस्या अधिक वाढते. जास्त प्रमाणात उकडलेल्या अंड्यांच्या पिवळ्या भागावर हिरवट थर साचल्याचं तुम्ही पाहिलं असेल. हा अंडी न खाण्याचा संकेत समजावा.



अंड्यातल्या पांढऱ्या भागातल्या प्रथिनांमध्ये सल्फर असतं. या सल्फरची हायड्रोजनशी प्रक्रिया होऊन हायड्रोजन सल्फाइड नावाचा अत्यंत विषारी वायू तयार होतो. हायड्रोजन सल्फाइड अंड्याच्या आतल्या भागात शिरतो. उकडल्यानंतर अंड्याचं कवच उष्ण होत असल्याने या वायूला अंड्याच्या आत शिरण्यावाचून दुसरा पर्याय उरत नाही. अंड्याच्या पिवळ्या बलकातल्या लोहाचा हायड्रोजन सल्फाइडशी संपर्क होऊन आयर्न सल्फाइडची निर्मिती होते. यामुळे पिवळ्या बलकावर हिरवट थर साचतो. अंडं जेवढं जास्त उकडलं जाईल तेवढं हायड्रोजन सल्फाइडच्या निर्मितीचं प्रमाण वाढेल. त्यामुळे प्रमाणाबाहेर उकडलेली अंडी खाणं टाळावं.

## स्थूल आहात?

आयुर्वेद आणि विकार

स्थूलपणा विविध व्याधींना निमंत्रण देतो. आयुर्वेदात स्थूलपणावर काही उपाय सांगण्यात आले आहेत. संतुलित आहार आणि व्यायाम यांची योग्य सांगड घातली तर आयुर्वेदिक उपायांनी बरेच लाभ होऊ शकतात. शरीरात आमामुळे स्थूलपणा वाढतो. चुकीची जीवनशैली, प्रदूषण आणि अन्नपचन योग्य पद्धतीने न झाल्यामुळे शरीरात आम या विषारी घटकाची निर्मिती होते. आमामुळे शरीराच्या विविध कार्यांमध्ये अडथळे निर्माण होतात. त्यामुळे स्थूलपणा कमी करण्यासाठी आमाचं निर्मूलन करण्यावर आयुर्वेदाचा भर असतो. शरीरात आम असताना वजन कमी करणं जवळपास अशक्य होऊन बसतं, असं तज्ज्ञ सांगतात. म्हणूनच आहारावर नियंत्रण आणूनही अनेकांचं वजन कमी होत नाही.



त्यामुळे आमाचं प्रमाण कमी केल्यानंतरच वजन कमी करण्याची प्रक्रिया सुरू करायला हवी.

काही आयुर्वेदिक औषधी आमावर प्रभावी ठरतात. त्यात हळद, त्रिकातू, दारूहळद (बार्बेरी), त्रिपबला आणि गुग्गुळ यांचा समावेश करावा लागेल. स्थूल लोकांनी हलका आहार घेण्याचा सल्ला आयुर्वेदिक तज्ज्ञ देतात. पचनतंत्र सुधारण्यासाठी गुग्गुळासारख्या औषधाचा वापर करता येईल. दिवसातून तीन वेळा एक छोटा चमचा गुग्गुळ घेता येईल. आलं आणि मध घातल्याने गुग्गुळ आमावर अधिक प्रभावी ठरेल.

आम कमी करण्यासाठी फायबरयुक्त आहार घ्यावा. तसंच फार प्रक्रिया केलेलं अन्न खाऊ नये.

## धोकादायक फायब्रोमायल्जिया

व्याधी विचार

फायब्रोमायल्जिया नावाचा एक विकार आहे. हा विकार पुरुषांच्या तुलनेत महिलांना अधिक प्रमाणात होतो. ३० ते ५० या वयोगटातल्या महिलांना हा विकार जडण्याचा धोका बराच जास्त असतो. ब्रिटनमधल्या एका संशोधनानुसार २५ पैकी एक व्यक्तीला हा विकार होऊ शकतो. ब्रिटनमध्ये १५ ते २० लाख लोकांना हा विकार झाल्याचं एका आकडेवारीवरून समोर आलं आहे. या विकाराविषयी जाणून घेऊ.

फायब्रोमायल्जिया या विकारात स्नायूंमध्ये प्रचंड वेदना जाणवतात. या असह्य वेदनांमुळे माणूस अक्षरश: कळवळतो. आपल्या मानसिक स्थितीवर याचा परिणाम होतो. या विकारामुळे मेंदूच्या कार्यपद्धतीवरही परिणाम होण्याची शक्यता असते. दुखापत, शस्त्रक्रिया, जंतूसंसर्ग आणि नैराश्यामुळेही ही व्याधी जडू शकते. या विकारात रुग्ण स्वत:वरचं नियंत्रण हरवून बसतो. त्यामुळे अत्यंत धोकादायक असा हा विकार आहे. ही व्याधी पूर्ण बरी होऊ शकत नसली तरी त्यावर औषधांद्वारे नियंत्रण मिळवता येतं.

अशक्तपणा, थकवा, सततची




आजारपणं, झोप न येणं, काळजी, नैराश्य, संवेदनशीलता वाढणं, शरीरात प्रचंड वेदना जाणवणं ही या विकाराची लक्षणं आहेत. या विकाराची नेमकी कारणं अजूनही समोर आलेली नाहीत. मात्र हा विकार जडलेल्या लोकांना सकाळी उठल्यानंतर थकवा जाणवतो. रात्रीची भरपूर झोप झाली असली तरी त्यांना ताजंतवानं वाटत नाही. या विकारामुळे एकाग्रताही नष्ट होते. आपण एकाच ठिकाणी लक्ष केंद्रित करू शकत नाही. या विकारामागे अनुवंशिक कारणं असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. या विकाराचा धोका अधिक असल्यामुळे महिलांनी विशेष काळजी घेणं गरजेचं आहे. घरात या विकाराचा इतिहास असेल तर इतरांना तो जडण्याचा धोका वाढतो.

प्रचंड शारीरिक वेदना आणि अपुरी झोप यामुळे दैनंदिन कामं करताना बऱ्याच अडचणी येतात. दृष्टी अधू होणं, मळमळणं, अचानक वजन वाढणं, चक्कर येणं, सर्दी–खोकल्यासारखी लक्षणं जाणवणं. त्वचेशी संबंधित समस्या, श्वसनाशी संबंधित समस्या निर्माण होतात. रूग्णाची लक्षणं बघून मगच उपचार दिले जातात. प्रत्येक व्यक्तीमध्ये या विकाराची वेगवेगळी लक्षणं दिसून येतात.

### ट्यूमर नष्ट करणारी थेरपी

नवसंशोधन

चीनमधल्या शास्त्रज्ञांनी ट्यूमर नष्ट करणाऱ्या थेरपीचा शोध लावला आहे. या थेरपीमुळे थेट ट्यूमरवर हल्ला करणं शक्य होणार आहे. ही थेरपी कॅन्सर रुग्णांसाठी वरदान ठरू शकते. 'सायन्स इम्युनॉलॉजी' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रकाशित करण्यात आलं आहे. ही थेरपी आधीच्या काही थेरपींच्या तुलनेत अधिक प्रभावी ठरू शकते, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे. शांघाय इंस्टीट्यूट ऑफ मटेरिआ मेडिकामधल्या शास्त्रज्ञांनी हे संशोधन केलं असून यामुळे कॅन्सरवरच्या उपचारांना गती मिळणार आहे. त्यांनी कॉमन चेकपॉईंट इनहिबिटरची निर्मिती केली आहे. हा इनहिबिटर म्हणजे ट्यूमरविरोधी औषध आहे. हे नवसंशोधन कॅन्सरवरच्या उपचारांच्या दृष्टीने वरदान ठरू शकेल.



### दातांचं प्रत्यारोपण करताना...

दंतारोग्य


दातांचं प्रत्यारोपण सर्वसाधारणपणे यशस्वी ठरतं. पडलेल्या किंवा किडलेल्या दातांच्या जागी नवा दात बसवण्याच्या प्रक्रियेला दंत प्रत्यारोपण म्हणतात. ही अत्यंत सर्वसाधारण प्रक्रिया आहे. ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरत असली तरी काही समस्याही उद्‌भवू शकतात. दंत प्रत्यारोपणाशी संबंधित जंतूसंसर्ग होऊ शकतो. तोंडाचं आरोग्य न राखल्यामुळे ही समस्या निर्माण होऊ शकते. जंतूसंसर्ग झाल्यानंतर प्रत्यारोपण केलेल्या भागातल्या हाडांमध्ये दाह जावणतो. त्यामुळे दातांच्या प्रत्यारोपणादरम्यान काळजी घेणं गरजेचं आहे.



### चोळू नका डोळे

डोळ्यांचं आरोग्य

धूळ, ॲलर्जी आणि कॉम्प्युटर, मोबाईलच्या स्क्रीनकडे एकटक बघत राहिल्यामुळे डोळे कमकुवत होतात. त्यांच्यावर बराच ताण येतो. डोळ्यात काही गेल्यावर आपण ते चोळू लागतो. यामुळे थोडा आराम मिळत असला तरी वरचेवर डोळे चोळणं धोकादायक ठरू शकतं. डोळे चोळल्यामुळे त्यातील अत्यंत नाजूक अशा रक्तवाहिन्यांची हानी होऊ शकते. डोळ्यांना सतत स्पर्श केल्यामुळे जंतूसंसर्ग होण्याचा धोकाही वाढतो. डोळे चोळल्यामुळे कोरडे पडू शकतात. काचबिंदूच्या रुग्णांनी डोळे अजिबात चोळू नयेत. चोळल्यामुळे डोळ्यांवर अतिरिक्त दाब निर्माण होऊन क्वचितप्रसंगी अंधत्वही येऊ शकतं.



### औषधी विडा

आजीबाईचा बटवा

जेवणानंतर अनेकजण पान किंवा विडा खातात. विडा खाणं ही फक्त एक आवड नाही तर ही एक आरोग्यदायी सवय आहे. विड्याचं पान औषधी असतं. त्यात प्रथिनं, कर्बोदकं, कॅल्शियम, फॉस्फरस, लोह, आयोडिन आणि पोटॅशियमसारखे पोषक घटक असतात. सर्दी–खोकल्यात हळदीचा भाजलेला तुकडा पानात घालून खाल्ल्याने आराम मिळतो. बोटं सुजल्यानंतर ही पानं थोडी गरम करून बोटांवर गुंडाळल्याने बरं वाटतं. विडा तयार करताना त्यात विविध घटक घातले जातात. पानात बडिशेप घातली जाते. ही बडिशेप आरोग्यवर्धक असून यामुळे पचनसंस्थेचं कार्य सुरळीत सुरू रहायला मदत होते. बडिशेपमध्ये आम्लविरोधी गुणधर्म असतात.



# शहरातील सर्व खासगी रुग्णालयांची महानगरपालिकेकडून होणार तपासणी

### शुश्रूषागृह नोंदणी कायद्यानुसार सेवा सुविधांची अंमलबजावणीबाबत शासनाला अहवाल देणार, तपासणीसाठी ७ अधिकाऱ्यांची नियुक्ती : आयुक्त यशवंत डांगे

नगर – महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी नियम, २०२१ अंतर्गत राज्यातील नोंदणीकृत खाजगी रुग्णालयाची तपासणी करुन दैनंदिनी अहवाल सादर करण्याचे आदेश राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने दिले आहेत. महिनाभरात ही तपासणी पुर्ण करून त्याचा दैनंदिन अहवाल आरोग्य सेवा आयुक्तालयास सादर करावा, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला दिले आहेत. त्यानुसार सातही आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना या तपासणीचे आदेश देण्यात आले आहेत.

खासगी रुग्णालयांकडून महाराष्ट्र शुश्रूषा गृह नोंदणी नियम, २०२१ अंतर्गत नियमांचे काटेकोरपणे पालन होते किंवा नाही, याची खातरजमा या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्राधान्याने रुग्णालयामध्ये आकारण्यात येणाऱ्या फी व इतर रुग्णालयीन सेवेचे शुल्क, दरपत्रक रुग्णालयाच्या दर्शनी भागांत लावण्यात यावे. तसेच महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी नियम, २०२१ मधील अंतर्भूत रुग्ण हक्क संहिता रुग्णालयाच्या दर्शनी भागांत स्वच्छ अक्षरात लावण्यात यावी, असे निर्देश आहेत. याबाबत तसेच, रुग्णालयातील मंजूर खाटा व प्रत्यक्षात असलेल्या खाटा संख्या, अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र व फायर ऑडिट, जैववैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट, नर्सिंग क्टची अंमलबजावणी आदींची महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात येणार आहे.

याबाबतची संपूर्ण कार्यवाही एक महिन्यांत पूर्ण करावयाची असल्याने दैनंदिन रुग्णालय तपासणीचा अहवाल करुन एकत्रित अहवाल आयुक्तालयास सादर करावा. यात सर्व नोंदणीकृत रुग्णालयांकडून महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी नियम २०२१ मधील नियमांचे काटेकोरपणे पालन होते किंवा नाही याची खातरजमा करून स्पष्ट अहवाल द्यावा. आपल्या कार्यक्षेत्रातील दैनंदिन २ ते ५ रुग्णालयांची तपासणी करून कार्यालयाकडे सादर करावा, अशा सूचना वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी तपासणीसाठी नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# जिल्हा पोलीस दलातील राजेंद्र वाघ यांचा राष्ट्रपती पदकाने देशपातळीवर सन्मान



नगर – जिल्हा पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र देवमन वाघ यांना पोलीस दलातील ३४ वर्षांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त या पदकांची घोषणा होते. त्यात नगर जिल्ह्यातून राजेंद्र वाघ यांचा देशपातळीवर सन्मान होणार आहे.

पोलीस दलातील ढाण्या वाघ म्हणून परिचित असलेल्या वाघ यांनी अनेक मोहिमा फत्ते केलेल्या आहेत. अतिशय प्रामाणिक, कर्तव्याप्रती जागरूक असलेला उत्कृष्ट पोलीस अधिकारी म्हणून श्री. वाघ यांची प्रतिमा आहे. जनतेशी नाळ जुळलेला एक संवेदनशील माणूस म्हणूनही त्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांचे सर्वसामान्य जनतेशी उत्तम संबंध आहेत. त्यामुळे गुन्ह्याची उकल करण्याकामी माहितगार लोकांचे सहकार्य घेऊन त्या माध्यमातून गुन्हेगारांना वठणीवर आणण्याचे काम त्यांनी उत्तमरित्या केलेले आहे. पोलीस खात्याची प्रतिमा सामान्य जनतेमध्ये सुधारण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. गुन्हेगारांना कायद्याची जरब बसविण्याबरोबरच तुटणारे संसार वाचविण्यासाठी, भरकटलेल्या युवकांना योग्य म ार्गावर आणण्यासाठीही समुपदेशनाच्या माध्यमातून श्री. वाघ यांनी आपले महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. खाकी वर्दीतील एक संवेदनशील माणूसही त्यांच्यात पाहायला मिळतो. राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याने त्यांचा यथोचित गौरव झाला असून, याबद्दल श्री. वाघ यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## सक्कर चौकात मालट्रक फसला

शहरातील नगर-पुणे रोडच्या कडेला सक्कर चौक परिसरात ड्रेनेज लाईनचे काम सुरु असून त्यासाठी खोदलेला रस्ता तात्पुरत्या स्वरुपात बुजविण्यात आल्याने त्याचा अंदाज न आल्यामुळे त्या ठिकाणी मालवाहतूक करणारा ट्रक खड्ड्यात फसला. सुदैवाने यावेळी कोणतीही दुर्घटना झाली नाही. अशा घटना घडू नयेत म्हणून जास्त वर्दळीच्या महामार्गावर काम करताना ठेकेदाराने पुरेशी काळजी घ्यावी, अशी मागणी होत आहे.

## घरासमोरून ट्रॅक्टरच्या ट्रॉलीची चोरी

नगर – घराजवळ लावलेल्या ट्रॅक्टरची मयूर फॅब्रिकेशन असे नाव असलेली ट्रॉली कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील दहिगाव साकत येथे १९ जानेवारीला दुपारी १२ ते सायंकाळी ५ या कालावधीत घडली. याप्रकरणी अशोक जयवंत शिंदे (वय ४५, रा. दहिगाव साकत, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता ३०३ (२) अन्वये अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# जिल्ह्याच्या स्वीप उपक्रमाचा जागतिक स्तरावर गौरव

### ३ विश्वविक्रमांची नोंद

नगर – नुकत्याच झालेल्या लोकसभा आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीतील लोकाभिमुख व दर्जेदार मतदार जनजागृतीच्या सर्वाधिक (१६८) नावीन्यपूर्ण स्वीप उपक्रमांची इंग्लंडच्या लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये, तसेच सर्वाधिक स्वीप जनजागृतीच्या साहित्य संकलनाचा (१६ लाख ९४ हजार ८३७) युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेच्या बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश झाला आहे. याशिवाय वोटींग सेल्फी पॉईंटवर सर्वाधिक सेल्फी फोटो (१४ हजार ४६५) घेण्याच्या विक्रमाचा होप इंटरनॅशनल वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समावेश झाला आहे. या कामगिरीबद्दल अहिल्यानगरचे जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचा इंग्लंड व अमेरिकेच्या संस्थांकडून प्रमाणपत्रे देऊन गौरव करण्यात आला आहे.



जिल्ह्याच्या स्वीप उपक्रमाचा जागतिक स्तरावर गौरव करण्यात आला.

जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, जिल्हा मतदारदूत डॉ.अमोल बागुल, निवडणूक नायब तहसीलदार प्रशांत गोसावी आदींनी समितीच्यावतीने या प्रमाणपत्रांचा स्वीकार केला.

जिल्हाधिकारी सालीमठ यांच्या निर्देशानुसार दोन्ही निवडणुकांमध्ये जिल्ह्यात राबवण्यात आलेल्या सुमारे १६८ प्रकारचे नाविन्यपूर्ण गटातील उपक्रमांच्या माध्यमातून सुमारे १६ लाख ९४ हजार ८३७ एवढ्या विक्रमी संख्येने फोटो, व्हिडिओ, ऑडिओ, दस्तऐवज, पीडीएफ, वृत्तपत्र कात्रणे, ऑफलाइन/ऑनलाइन फाइल्स, ऑडिओ जिंगल्स, इमोजी, लिंक्स, जीआयएफ, शॉर्ट युआरएल, गुगल मीटिंग, पीपीटी सादरीकरणे व संदेश या स्वरूपात स्वीप जनजागृतीचे साहित्य प्राप्त झाले.

मिशन – ७५ मोहिमेअंतर्गत लोकशाहीचे शिल्पकार पुरस्कार, स्वीप मंडपम, विधानमंडप, मतदारनगरी, देशातील पहिलाअहिल्यानगर स्वीप केअर व्हॉट्सअप क्रमांक, आग्युमेंटेड आणि व्हर्च्युअल रियालिटी (एआर-व्हीआर), आर्टिफिशियल इंटेलिजन्स व गुगल असिस्टंटचा वापर, संकल्प पत्र, ई-मतदार शपथ, लोकशाहीचे मतस्थानक, वोटर स्टेशन, एयर डेमोक्रॉसी, डीपी बोले तो..., डेमोक्रसी पार्टीसिपेशन, लोकशाहीची शाळा, लोकशाहीचा दीपोत्सव, आमचे कुटुंब- आमची लोकशाही, डेमोक्रॉसी स्टुडिओ, रक्षाबंधनानिमित्त क्यूआर कोड राख्यांची निर्मिती, स्वातंत्र्यदिनानिमित्त क्युआर कोडमध्ये भारतीय तिरंगा, स्वीप चॅम्पियन पुरस्कार, मी मतदारदूत, डी-व्हिडीओ, स्वीप टीव्ही चॅनेल, विधान पत्रिका, विधानसभेची पूर्वपीठिका ग्रंथ, लोकशाहीचा जागरमधील २४ प्रकारच्या स्पर्धा आदी वैशिष्ट्यपूर्ण व नावीन्यपूर्ण शेकडो उपक्रमांची दखल यानिमित्ताने घेण्यात आली आहे.

आतापर्यंत अमेरिकन मेरिट कौन्सिल, केंद्रीय संचार ब्युरो-भारत सरकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय-महाराष्ट्र, विभागीय आयुक्त कार्यालय-नाशिक विभाग-नाशिक या आंतरराष्ट्रीयराष्ट्रीय व राज्य संस्था व कार्यालयांनी, तसेच निवडणुक आयुक्त डॉ. सुखविंदर सिंग संधू, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, स्वीप संचालकसंतोष अजमेरा, स्वीप वरिष्ठ सल्लागार आराधना शर्मा, विशेष निवडणूक निरीक्षक श्रीराम, नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी विधानसभा निवडणूकीत भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक आदींनी अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीच्या उपक्रमांचे वेळोवेळी कौतुक केले आहे.

शिक्षणाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी अशोक कडूस, शिक्षणाधिकारी- योजना बाळासाहेब बुगे, स्वीप समिती सदस्य आदींनी या उपक्रमासाठी मार्गदर्शन व सहकार्य केले.

## डॉ.दीपक हरके यांना 'संचलना'चे निमंत्रण



नगर – नवी दिल्लीतील कर्तव्यपथ येथे प्रजासत्ताकदिनी होणाऱ्या संचलन सोहळ्यात अहमदनगरमधील ध्यानधारणा प्रशिक्षक बीके डॉ. दीपक हरके यांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित केले आहे. ध्यानधारणेच्या क्षेत्रात जगभरात केलेल्या योगदानाबद्दल बीके डॉ. दीपक हरके यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळ्यांवरील विशेष पाहुण्यांसमवेत उपस्थित राहण्याचा बहुमान मिळणार आहे. याचबरोबर त्यांना राष्ट्रपती भवनात मुक्काम करण्याची संधी मिळाली असून राष्ट्रपती भवनातील मुगल गार्डन मध्ये प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या ऐट होम रिसेप्शनमध्येही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळ्यांवरील विशेष पाहुण्यांसमवेत सहभागी होण्याचे निमंत्रण मिळाले आहे.

## जिल्हा नियोजन समितीची १ फेब्रुवारी रोजी बैठक

नगर – राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली १ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांनी कळविले आहे.

# सुपा येथे उत्पादन कार्याचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत केला 'सामंजस्य करार'

### १२०० हून अधिक रोजगाराच्या संधी

नगर – जागतिकस्तरावरील इंटिग्रेटेड अल्युमिनियम कास्टिंग फाउंड्री असलेल्या टॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने सुपा (अहिल्यानगर, महाराष्ट्र) येथील १२,००,००० चौरस फूट उत्पादन सुविधेचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत एक ऐतिहासिक सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. हा सामंजस्य करार वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमदरम्यान दावोस येथील महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये झाला, ज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्य वरिष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते.



जागतिकस्तरावरील इंटिग्रेटेड अल्युमिनियम कास्टिंग फाउंड्री असलेल्या टॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने सुपा (अहिल्यानगर) येथील १२,००,००० चौरस फूट उत्पादन सुविधेचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत ऐतिहासिक सामंजस्य करार (एमओयू) केला आहे.

या सुविधेमुळे १२०० हून अधिक स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, या भागातील समुदायाच्या प्रगतीसाठी एक परिवर्तनकारी पाऊल उचलले गेले आहे.

व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, टॉरल इंडिया, या उपक्रमाबद्दल भरत गिते बोलताना म्हणाले, महाराष्ट्रातील एका छोट्या शहरातून आल्यामुळे, मी नेहमीच टियर २ भागातील अफाट क्षमतेवर विश्वास ठेवला आहे आणि त्यांच्या प्रगतीसाठी संधी शोधण्याचा निर्धार केला आहे. २०२० मध्ये मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटलो तेव्हा त्यांच्याशी या दृष्टिकोनाबद्दल चर्चा करण्याचे भाग्य मला मिळाले आणि आज त्यांच्याच दूरदृष्टीमुळे हे स्वप्न साकार होत असल्याचे पाहून मला अभिमान वाटतो. या भागात जागतिक दर्जाचे कौशल्य आणि तंत्रज्ञान विकसित करून, जागतिक दर्जाची पायाभूत संस्कृती प्रस्थापित करण्याचा आम्हाला विश्वास आहे. स्थानिक क्षेत्रामध्ये जागतिक कौशल्य आणि नवकल्पनांचे संयोजन करून, सुपाला उत्पादनाचे केंद्र म्हणून विकसित करण्याचे आमचे ध्येय आहे आणि या भागाच्या विकासासाठी नवीन मानके स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहोत.सुपा हे एक धोरणात्मक स्थान असून, प्रमुख बाजारपेठांच्या जवळ असल्यामुळे प्रगत उत्पादनाचे एक केंद्रबिंदू म्हणून ओळखले जाते.

टॉरल इंडियाने या भागात विस्तार करण्याचा निर्णय घेतल्याने अहिल्या नगरच्या ऊर्जा, संरक्षण, एरोस्पेस, रेल्वे, सागरी, आरोग्यसेवा आणि इतर उच्च-विकास क्षेत्रांमध्ये भारताला पाठिंबा देण्याच्या क्षमतेवरील विश्वास दिसून येतो.



अतिक्रमित रस्ता मोकळा करण्यासाठी जिल्हा परिषदेसमोर बेमुदत उपोषण सुरू आहे.

# अतिक्रमित मध्यरात्री ताबा मारलेला रस्ता मोकळा करण्यासाठी जिल्हा परिषदेसमोर 'बेमुदत उपोषण' दुसऱ्या दिवशीही सुरू

### प्राण गेले तरी चालेल परंतु ग्रामस्थांना न्याय मिळाल्याशिवाय मी उपोषण सोडणार नाही

नगर – नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील या गावातील साईनगरमधील साई मंदिर ते पिंपळा रस्त्यावर बेकायदेशीर अतिक्रमण केल्याबाबत चिचोंडी पाटीलचे सरपंच शरद पवार व ग्रामस्थांच्या वतीने आमरण उपोषणाला सुरुवात झाली. यात कुठलाही तोडगा निघाला नसून आज दुसरा दिवस उजाडला तरी देखील चिचोंडी पाटील ग्रामस्थ व सरपंचांचे आमरण उपोषण सुरू आहे.

सरपंच शरद पवार म्हणाले की जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्याचे पालकत्व घेतले आहे, त्यांच्या जबाबदारीनुसार त्यांनी चिचोंडी पाटील ग्रामस्थांचे प्रश्न सोडवावे व ग्रामस्थांना न्याय मिळवून द्यावा जर त्यांच्याकडूनही होत नसेल तर उद्या २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, शासकीय कार्यालय मध्ये ते पालकमंत्री म्हणून ध्वजारोहण करतात ते ध्वजारोहण करायचा त्यांचा कुठलाच नैतिक अधिकार, हक्क राहत नाही जर त्यांना जनतेचे प्रश्न सोडवता येत नसेल तर असे सरपंच पवार म्हणाले.

## कत्तलीसाठी चालविलेल्या गोवंशीय जनावरांचा टेम्पो पकडला

नगर – गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यास, तसेच वाहतूक करण्यास मनाई असताना टेम्पोमध्ये दाटीवाटीने जनावरे भरून त्यांना चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तल करण्यासाठी नेणारा टेम्पो नगर तालुका पोलिसांनी पकडला. या कारवाईत २ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ५ गोवंश जनावरांची सुटका केली. ही कारवाई केडगाव ते निमगाव वाघा रोडवर, नेप्ती शिवारात, वैभव पशुखाद्य गोडाऊन जवळ २४ जानेवारीला पहाटे करण्यात आली.

याबाबतची माहिती अशी की नेप्ती शिवारातील केडगाव ते निमगाव वाघा रोडवर एक टेम्पो गोवंश जनावरे भरून कत्तल करण्यासाठी घेऊन जात आहे. अशी माहिती अखिल भारतीय कृषी गोसेवा संघाचे सदस्य गोरक्षक चांगदेव भालसिंग यांना मिळाली. त्यांनी ही माहिती नगर तालुका पोलिसांना दिली. त्या माहितीनुसार नगर तालुका पोलिसांनी नेप्ती शिवारात केडगाव ते निमगाव रोडवर थांबले असता त्यांना अशोक लेलँड कंपनीचा एक टेम्पो येताना दिसला. पोलिसांनी टेम्पो थांबवला असता टेम्पो चालक व त्याच्याबरोबर असलेला एक जण टेम्पो सोडून तेथून पसार झाले. पोलिसांनी टेम्पोची पाहणी केली असता टेम्पोमध्ये पाच गोवंश जनावरे दाटीवाटीने बांधलेले असल्याचे दिसून आले. पोलिसांनी टेम्पोतील दोन जर्सी गाया, दोन गोऱ्हे, एक बैल व अशोका लेलँड टेम्पो (क्र. एम एच १६ ए वाय ०२८२) असा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता टेम्पो चालकाचे नाव योगेश मारुती नाईकवाडे आणी त्याचा सहकारी अल्पेश बेपारी (पूर्ण नाव पत्ता माहित नाही) असे असल्याचे समजले.

या प्रकरणी नगर तालुका पोलीसांनी गोरक्षक चांगदेव भालसिंग यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन या दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



अल्पवयीन मुलीस पळवून नेवूनअत्याचार करणाऱ्या आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

## अल्पवयीन मुलीला पळवून नेवून अत्याचार करणाऱ्या फरार आरोपीला पकडले

नगर – वडगाव गुप्ता (ता.नगर) येथील अल्पवयीन मुलीस पळवून नेवून, तिचेवर अत्याचार करणाऱ्या फरार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. अक्षय रायल चव्हाण (रा.घोटवी, ता.श्रीगोंदा) असे या आरोपीचे नाव आहे. आरोपी अक्षय चव्हाण याने ६ ऑक्टोबर २०२४ रोजी वडगाव गुप्ता (ता.नगर) येथील अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमीष दाखवून पळवून नेऊन, तिचेवर वेळोवेळी अत्याचार केले बाबत एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तेव्हापासून आरोपी फरार होता. सदर घटनेचे गांभिर्य लक्षात घेवुन पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांना पथक नेमुन गुन्ह्याचा समांतर तपास करुन आरोपीला पकडण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार तपास सुरु असताना २४ जानेवारीला गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी अक्षय चव्हाण हा त्याचे राहते घरी आला आहे. ही माहिती मिळताच तपास पथकातील पोलीस अंमलदार बबन मखरे, हृदय घोडके, पंकज व्यवहारे, फुरकान शेख, अमोल कोतकर, मेघराज कोल्हे व अरूण मोरे यांनी तात्काळ घोटवी येथे जावून आरोपी अक्षय चव्हाण यास ताब्यात घेतले. त्याला गुन्हयाचे तपासकामी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असून तपास पोलीस करीत आहेत.

## ओंकार संगीत निकेतनतर्फे २६ जानेवारीला 'स्वतंत्रते भगवती' देशभक्तीपर गीतांची मैफल

नगर – ओंकार संगीत निकेतन प्रस्तुत 'स्वतंत्रते भगवती' हा राष्ट्रभक्तीपर गीतांचा एक अनोखा कार्यक्रम भिंगार येथील चौंडेश्वरी मंदिर, सरपण गल्ली येथे ओंकार आदिनाद कला प्रतिष्ठानतर्फे सादर होणार आहे. निकेतनच्या दरेवाडी आणि भिंगार शाखेकडून या कार्यक्रमात हिंदी मराठी अशी अनेक देशभक्तीपर गीत होणार आहेत. त्यांना संवादिनी साथ व मार्गदर्शन संगीता देऊळगांवकर व ओंकार देऊळगांवकर यांचे लाभले असून तबल्याची साथ सुपर्ण प्रताप, वैष्णवी कोल्हे, अनुज दरवडे करणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून कामगार न्यायालयाचे न्यायाधीश शरद देशपांडे हे उपस्थित असणार आहेत. कार्यक्रम २६ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अविनाश देऊळगांवकर आणि सहसचिव स्नेहल झांबरे यांनी दिली.

# शहरात स्ट्रीट लाईट व मोकाट कुत्र्यांचा प्रश्न गंभीर

### भिंगार शहरातील विविध प्रश्नाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांना निवेदन



भिंगार शहरातील विविध समस्यांबाबत आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाने विशाल बेलपवार यांच्या नेतृत्वाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांना निवेदन देण्यात आले.

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने भिंगार शहरातील विविध समस्यांबाबत आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाने भिंगार शहर सरचिटणीस विशाल बेलपवार यांच्या नेतृत्वाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांना निवेदन देण्यात आले. यावेळीसंपत बेरड, कलगीतुरा मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब कर्डीले, अल्पसंख्याक शहराध्यक्ष अकील शेख, युवकचे उपाध्यक्ष सागर चवडंके, अनिल सारसर, विद्यार्थीचे शहराध्यक्ष संकेत झोडगे, उपाध्यक्ष दिनेश लंगोटे, महर्षी वाल्मिक स्वामी फौंडेशनचे अध्यक्ष प्रविण घावरी, अखिल मेहतर समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष सनी खरारे, राजू नायर, सचिन रोकडे, भारत ठोकल आदी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, भिंगार शहरात मोकाट भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर होत असून रात्री अपरात्री नागरिकांना घराबाहेर येणे जाणे अवघड झाले असून तरी नागरिकांना मोकाट कुत्र्यापासून संरक्षण मिळावे यासाठी लवकरात लवकर कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावे व भिंगार नाल्यावर कचरा पडल्यामुळे संपूर्ण परिसर हे घाणीचे साम्राज्य झाले आहे. त्याच कारणाने संपूर्ण परिसरात व रस्त्यावर दुर्गंधी पसरून रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे परिसराची स्वच्छता करण्यात यावी तसेच भिंगार अर्बन बँक येथील गटारी हे तुंबलेल्या आहे ते साफसफाई करण्यात यावी तसेच भिंगार शहरात गेल्या बऱ्याच दिवसापासून मुख्य रस्त्यावर श्री गुरु गोरक्षनाथ मंदिर आहे त्या ठिकाणी दररोज भाविक दर्शनासाठी येत असतात तिथे स्ट्रीट लाईट बंद असल्यामुळे व मुख्य रस्त्यावर देखील लाईट बंद असल्याकारणाने रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे बंद असलेल्या ठिकाणी लाईट चालू करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

